# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक ०४ मार्च, २०२१ / फाल्गुन १३, १९४२ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **ग्रामविकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **महिला व बालविकास मंत्री** | |
| **(७)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

---

### अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील जिल्हा रूग्णालयाच्या इमारतीचे नुतनीकरण करण्याबाबत

**(१) * २०४३० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील सुमारे चाळीस वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या जिल्हा रूग्णालयाच्या इमारतीची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रूग्णालयाच्या इमारतीमधील अनेक ठिकाणचे प्लास्टर कोसळले असून इमारत पडू नये म्हणून इमारतीच्या एका बाजूला टेकू सुध्दा देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या धोकादायक इमारतीमुळे जिल्हा रूग्णालयात येणा-या हजारो रूग्णांसह त्यांचे नातेवाईक, डॉक्टर्स, नर्सेस यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व सदर जिल्हा रूग्णालयाच्या इमारतीचे तात्काळ नुतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

आंतररुग्ण इमारतीच्या रॅम्पला लोखंडी खांबाचे टेकू लावले आहेत.सद्य:स्थितीत रॅम्पची सुविधा बंद करण्यात आली आहे. सदर आंतररुग्ण इमारतीच्या रॅम्पची पुर्नबांधणी करणेसाठी कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांना प्राप्त झाले असून सदर अंदाजपत्रक जिल्हा नियोजन समितीकडे मंजुरीसाठी सादर केले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांचे स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परळी (ता.वाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(२) * २४२८१ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (ता.वाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करुन ग्रामीण रुग्णालयात रुपांतर करण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने दिनांक ५ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची अमंलबजावणी करण्यास विलंब होत असल्यामुळे स्थानिकांची गैरसोय होत असल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्र, परळीची जागा जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांचे नावे करण्याची कार्यवाही सुरु असून रुग्णालय इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करुन सादर करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सद्य:स्थितीत मौजे परळी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असून प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण तपासण्या, आंतररुग्ण सुविधा, प्रयोगशाळा चाचण्या, नॉर्मल प्रसुती सुविधा व इतर प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील सुविधा ह्या सदरील प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत पुरविण्यात येतात.

(३) हे खरे आहे.

(४)परळी (ता.वाडा, जि.पालघर) येथील ग्रामीणरुग्णालयाच्या इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंगणवाडीतील बालके व गर्भवती महिलांना पोषण आहार पुरविण्याचे कंत्राट स्थानिक महिला बचत गटांना देण्याबाबत

**(३) * २०९४५ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालविकास प्रकल्प अधिकारी, ग्रामीण व नागरी प्रकल्पांतर्गत येणा-या अंगणवाडीतील सहा वर्षे वयापर्यंतची बालके तसेच गर्भवती महिलांना गत ११ वर्षांपासून पोषण आहाराचा पुरवठा शासनाच्या वतीने स्थानिक महिला बचत गटांकडून करण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने स्थानिक महिला बचत गटांऐवजी पोषण आहार पुरविण्याचे कंत्राट मध्यवर्ती स्वयंपाकघर पध्दतीच्या (Central Kitchen) नावाखाली महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह स्टेट फाउंडेशन या संस्थेला सन २०२० मधील कोरोना संक्रमणाच्या काळात दिले असल्याने स्थानिक महिला बचत गटांचे कंत्राट रद्द करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक महिला बचत गटांना शासनाने कोणतीही पुर्वसूचना न देता त्यांचे कंत्राट रद्द केल्यामुळे त्यांचा रोजगार बंद झाल्याने पुर्वीप्रमाणेच स्थानिक महिला बचत गटांना पोषण आहार पुरविण्याचे कंत्राट देण्यात यावे, अशी मागणी राज्यातील महिला बचत गटांकडून मा. महिला व बालविकास मंत्री, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग तसेच आयुक्त, बालविकास यांचेकडे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार स्थानिक महिला बचत गटांकडे पोषण आहाराचा पुरवठा करण्याचे कंत्राट देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

राज्यात माहे मार्च, २०२० पासून कोवीड-१९ ची साथ सुरु झाल्यामुळे अंगणवाडीस्तरावर दिला जाणारा गरम ताजा आहार ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांनी एकत्रित बसून खाल्याने कोवीड-१९ या साथीचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी २० मार्च, २०२० पासून अंगणवाडीत दिला जाणारा गरम ताजा आहार बंद करुन त्याऐवजी THR अंतर्गत घरपोच आहार पुरवठयाचा निर्णय घेतला आहे. सदरचा निर्णय हा महिला मंडळ/बचतगटांचे काम बंद करण्यासाठी घेण्यात आला नसून ३ वर्ष ते ६ वर्ष या अतिसंवेदनशील लाभार्थ्यांमध्ये कोवीड-१९ ची साथ अधिक पसरु नये यासाठी घेण्यात आलेला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशीची आवश्यकता नाही, तथापी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडया सुरु करण्याबाबत महिला व बाल विकास विभागाने आपत्कालीन व्यवस्थापन विभागाकडे प्रस्ताव सादर केला असता आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने पुढील आदेशापर्यंत अंगणवाडी केंद्र सुरु न करण्याचा निर्णय घेतलेला आहे व महिला बाल विकास विभागाने आहार पुरवठयाची पर्यायी व्यवस्था पुढील आदेश होईपर्यंत सुरु ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत.

आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाने अंगणवाडया सुरु करण्याचे निर्देश दिल्यानंतर अंगणवाडी केंद्र सुरु करण्यात येतील व त्यासोबत स्थानिक महिला मंडळ/बचत गटांमार्फत अंगणवाडी केंद्रात गरम ताजा आहार सुरु करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामपंचायतींना १५ व्या वित्त आयोगांतर्गत निधी वितरीत करण्याबाबत

**(४) * २३४०९ डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील पंचायत समितीतील ७७ ग्रामपंचायतींपैकी केवळ १४ ग्रामपंचायतींना १५ व्या वित्त आयोगांतर्गत निधी वितरीत करण्यात आला असुन केळझरा को. अंबोडा, बेलोरा, भंसारा, देवगाव, जवळा, इचोरा, कवठा, मुकिंदपूर, पळशी, सायखेडा, साकुर, विठोली, शेकलगाव या ग्रामपंचायतींना १ कोटी १७ लाख १२ हजार १३२ रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला व उर्वरित ६३ ग्रामपंचायतींना निधी देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावातील पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळावी यासाठी शासनाकडून १५ व्या वित्त आयोगाचा निधी वितरीत करण्यात आला असुन या निधीतून ५० टक्के रक्कम पिण्याच्या पाण्यावर खर्च करण्यासाठी प्राधान्य दिले असताना उर्वरित निधी खर्च करण्याच्यादृष्टीने अद्यापपर्यंत

मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १५ व्या वित्त आयोगातंर्गत पिण्याचे शुद्ध पाणी आणि नळ जोडणी देण्याच्या दृष्टीने हा निधी त्वरित वितरीत करण्याचे निर्देश दिले असतांना अद्यापही आर्णी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ७७ पैकी ६३ ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध झालेला नसल्याने या ग्रामपंचायतींमधील नागरिक सोयी सुविधांपासून वंचित आहेत,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उर्वरित ६३ ग्रामपंचायतींना तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्हयातील आर्णी तालुक्यातील ७७ ग्रामपंचायतीना १५ व्या वित्त आयोगांतर्गत बंधित निधी रू.२.९४८५१४५/- कोटी व अबंधित निधी रू. २.९४८५१४५/- कोटी एवढा निधी वितरित करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत बंधित व अबंधित या दोन स्वरूपात शासनाकडून निधी प्राप्त झाला असून सन २०२०-२१ या पहिल्या आर्थिक वर्षाच्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित केलेल्या अनुदानातून घ्यावयाची कामे, त्यांचे नियोजन, समन्वय व नियंत्रण याबाबतच्या मार्गदर्शक सूचना शा.नि.दि.२६ जून,२०२० व शा.नि.दि.४ डिसेंबर, २०२० च्या अतिरिक्त मार्गदर्शक सूचना या नुसार देण्यात आलेल्या आहेत.त्यानुसार बंधित स्वरूपात प्राप्त एकूण निधीच्या प्रत्येकी ५०% निधीचा वापर १. स्वच्छता व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची हागणदारीमुक्त स्थिती अबाधित ठेवण्यासाठी, २. पिण्याचे पाणी याबाबींसाठी करावयाचा आहे.

(३) हे खरे नाही.

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत आर्णी तालुक्यातील ७७ ग्रामपंचायतीना बंधित व अबंधित या दोन स्वरूपात निधी प्राप्त झालेला असून त्यानुषंगाने ग्रामविकास आराखडा तयार करून कामे करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे शहरातील जिल्हा रुग्णालयास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) * २३१९५ श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले जुने शासकीय रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल) येथे १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय कार्यान्वित करण्यात आले असून येथे प्रशस्त जागा उपलब्ध असल्याने सदर रुग्णालयाचे २०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबतची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वी याच जागेत ५०० खाटांचे भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कार्यरत होते त्यामुळे आताच्या १०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करून २०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयात रुपांतर करणे कमी खर्चात शक्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयास निधी उपलब्ध करून देण्यासाठी अंर्थसंकल्पात तरतूद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा रुग्णालय, धुळेच्या श्रेणीवर्धनाला मान्यता दिल्यानंतर बांधकाम विभागा मार्फत अंदाजपत्रक मागविण्यात येईल. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३) हो, हे खरे आहे.

(४) सन २०११ जनगणनेवर आधारीत नवीन रुग्णालय सुरू करणे अथवा कार्यान्वित रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आयुक्त, आरोग्य सेवा यांच्याकडे सुरू असून जिल्हा रुग्णालय, धुळेचे १०० खाटांहून २०० खाटांच्या रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याची मागणी जोडबृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्यात आल्यास जिल्हा रुग्णालय, धुळेच्या श्रेणीवर्धीत रुग्णालयास प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वड्री खु. (ता.यावल,जि.जळगांव) येथील पाझर तलावांच्या दुरूस्तीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(६) * २३६७८ श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वड्री खु. (ता.यावल,जि.जळगांव) येथील शिवारात दोन पाझर तलाव सन २००६ मध्ये अतिवृष्टीमुळे फुटले असल्याने सदर दोन्ही पाझर तलावांच्या दुरूस्तीसाठी जिल्हा परिषदेमार्फत सन २०१७-१८ मध्ये निधी उपलब्ध करण्यात आला परंतु कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे काम करून बनावट देयके तयार करून गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत पाझर तलावांच्या कामाची चौकशी शासनाने केली आहे काय, व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहारातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कुष्ठरोगाच्या रुग्ण संख्येत वाढ होत असल्याबाबत

**(७) * २०३८८ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व),**

**कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या कुष्ठरोग शोधमोहिम अभियानात अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, पालघर, नाशिक, जालना या जिल्हयांमध्ये कुष्ठरुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात ३ लाख १९ हजार ८५४ घरांची आरोग्य कर्मचा-यांकडून तपासणी केलेल्या ९ दिवसांच्या कालावधीत तब्बल ६२ कुष्ठरोगाचे रुग्ण आढळले असल्याची बाब दिनांक ९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुष्ठरोग शोधमोहिम अभियानात लहान मुलांचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अभियानात आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांवर उपचार व या रोगाचे निर्मुलनकरीता जनजागृती तसेच कुष्ठरुग्णांची वाढती संख्या रोखण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

दि. ०१.१२.२०२० ते ३१.१२.२०२० या कालावधीत संपूर्ण राज्यात कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात आले. यामध्ये दि. ०९.१२.२०२० अखेर पालघर जिल्ह्यामध्ये एकूण ३ लाख ६० हजार ३०५ घरांची आरोग्य कर्मचा-यांमार्फत तपासणी करण्यात आली व या तपासणी मध्ये एकूण ८८ नवीन रुग्ण शोधण्यात आले. या संपूर्ण अभियानात पालघर जिल्ह्यात माहे डिसेंबर महिन्यात कुष्ठारोग शोध अभियानामध्ये २९६ नवीन रुग्ण आढळले असून या सर्व कुष्ठरोग्यांना बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आला आहे.

(३) होय.

कुष्ठरोग शोध अभियानामध्ये लहान मुलांना कुष्ठरोग असल्याचे आढळलेले आहे हे खरे आहे. या अभियानात माहे डिसेंबर २०२० मध्ये राज्यात एकूण ५२८१ नवीन कुष्ठरुग्ण आढळले असून त्यापैकी ४५० (८.५२ टक्के) लहान मुले (१४ वर्षांखालील) आढळली आहेत.

(४) कुष्ठरोग शोध अभियानात आढळलेल्या सर्व कुष्ठरुग्णांना त्वरीत मोफत बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आला आहे. व त्या त्यांच्या सहवासितांना प्रतिबंधात्मक औषधोपचार देण्यात आला आहे. तसेच आरोग्य कर्मचा-यांकडून राज्यामधील नियमित सर्वेक्षण करण्यात येत आहे. या रोगाचे लवकर निदान होण्यासाठी विविध स्तरावर जनजागृती करण्यात आली आहे. दि.०८.०२.२०२१ पासून राज्यात सक्रिय कुष्ठरोग शोध अभियान व नियमित सनियंत्रण कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाढत्या रक्तक्षयाचे व अतिसाराचे प्रमाण रोखण्याबाबत

**(८) * २१९३५ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५६ टक्के बालके, गरोदर माता, आणि महिला रक्तक्षयाने (ॲनिमिया) त्रस्त असल्याची बाब नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या अहवालातून माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी सन २०१५-१६ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या तुलनेत रक्तक्षयाने त्रस्त असणाऱ्यांचे प्रमाण ६ टक्यांहून अधिक वाढले असुन ग्रामीण भागात पाच वर्षाखालील बालकांमध्ये अतिसाराचे (डायरिया) प्रमाणही वाढल्याचे या सर्वेक्षणात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अकोला जिल्ह्यात गेल्या ५ वर्षांत महिलांमधील विविध आजारांमध्ये वाढ झाली असून यामध्ये रक्तक्षयग्रस्त महिलांची संख्या जास्त असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ॲनिमियामुक्त भारत ही घोषणा केंद्र शासनाने केली आहे तथापि याबाबतच्या उपाययोजना जिल्हास्तरीय यंत्रणेकडून योग्यरितीने होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील रक्तक्षयाचे व ग्रामीण भागातील बालकांमध्ये अतिसाराचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

तथापि, सन २०१५-१६ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या तुलनेत १५-४९ वर्षे वयोगटातील गरोदर मातांमधील रक्तक्षयाच्या प्रमाणात ३.६ टक्क्याने घट झाली आहे. अतिसाराच्या प्रमाणात अल्प वाढ झाल्याचे दिसून येते.

(३) अंशत: खरे आहे.

१५ ते ४९ वर्षे वयोगटातील गरोदर नसलेल्या महिलांमधील रक्तक्षयग्रस्त महिलांच्या प्रमाणात घट झाली असून १५ ते ४९ वर्षे वयोगटातील गरोदर मातांमधील रक्तक्षयग्रस्त महिलांच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) ॲनिमियामुक्त भारत कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनानुसार उपाय योजनांबाबत जिल्हास्तरीय यंत्रणेकडून रक्तक्षयाचे व अतिसाराचे प्रमाण कमी करण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना राबविण्यात येतात. :-

१) ॲनिमियामुक्त भारत कार्यक्रम :- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार ०६-५९ महिने या वयोगटातील आणि ०६-१० वर्षे वयोगटातील बालकांना, १०-१९ वर्षे किशोरवयीन वयोगटातील मुला-मुलींना, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता व प्रजननक्षम वयोगटातील महिला यांना आयर्न व फॉलिक ॲसिडची प्रतिबंधात्मक पुरक मात्रा देण्यात येते तसेच हिमोग्लोबीन तपासणी करण्यात येते.

२) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम :- या कार्यक्रमांतर्गत फिरते वैद्यकीय पथकांमार्फत राज्यभरातील शासकीय व निमशासकीय शाळा व अंगणवाडयामधील बालकांची ४ Ds अंतर्गत (डिसीज, डिफीशियन्सी, डिफॉरमेटी व डेव्हलपमेंटल डिले) तपासणी करण्यात येते ज्यामध्ये रक्तक्षयाची सुध्दा तपासणी करण्यात येते.

३) जंतनाशक मोहिम :- राज्यातील सर्व जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागात एकाच वेळी वर्षातून दोनवेळा ०१ ते १९ वर्षे वयोगटातील बालकांना जंतनाशक औषध देण्यात येते.

४) प्रत्येक मातेस रक्तक्षय नसल्यास प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात दररोज १ यानुसार १८० गोळया तसेच रक्तक्षय असल्यास प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात दररोज २ गोळया अशा ३६० गोळया देण्यात येतात.

५) गरजेनुसार तीव्र रक्तक्षय असलेल्या मातांना शिरेद्वारे इंजे. आयर्न सुक्रोजही देण्यात येते.

६) गरोदर मातेस पहिल्या तिमाही नंतर Albendazole ४०० mg ची १ गोळी देण्यात येते.

७) मानव विकास कार्यक्रमांतर्गत गरोदर मातांची स्त्रीरोग तज्ञांकडून वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बालकांमधील कुपोषण व अतिस्थुलतेचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(९) * २२८०३ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ताज्या पोषण आहाराचा अभाव, कोरोना या संसंर्गजन्य आजारामुळे जाहीर केलेल्या टाळेबंदीमुळे ब-याच कुटुंबाची आर्थिक स्थिती खालावली असल्यामुळे व काही अंगणवाडीमध्ये दिला जाणारा निकृष्ट दर्जाचा शिधा यामुळे कुपोषणाच्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे माहे नोव्हेंबर- डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षाच्या तुलनेत विशेषतः आदिवासी भागात शून्य ते पाच वयोगटातील बालकांचे कुपोषणाचे प्रमाण साडेतीन वरून साडेपाच टक्क्यांपर्यंत वाढले असल्याचे व आरोग्य व एकात्मिक बाल विकास विभागाच्या सर्वेक्षणानुसार राज्यात ७८,९८९ बालके कुपोषित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गावाबाहेर गेलेली कुटुंबे तसेच रोजगारासाठी स्थलांतर झालेल्या कुटुंबातील बालकांची शासकीय आकडेवारीत नोंदच समाविष्ट नसल्याने शासकीय यंत्रणेकडे असलेल्या कुपोषित बालकांच्या आकडेवारीचा मेळ लागत नसल्याची बाब देखील निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील अतितीव्र कुपोषित बालकांना कुपोषणमुक्त करण्यासाठी अंगणवाडी स्तरावर नव्याने २७०० बालविकास केंद्रे सुरू करण्याचा निर्णय झाला असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या पाचव्या अहवालात (एनएफएचएस सन २०१९-२०) राज्यात कुपोषणाबरोबर अतिस्थूलतेचे प्रमाण एक टक्क्यावरुन चार टक्क्या पर्यंत वाढले असल्याची बाब माहे डिसेंबर २०२० च्या तिस-या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यातील कुपोषणाचे प्रमाण वाढू नये तसेच अतितीव्र कुपोषित बालकांना कुपोषणमुक्त करण्यासाठी बालविकास केंद्रे सुरु करण्यासह बालकामधील अतिस्थूलतेचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत माहे मार्च, २०२० व माहे डिसेंबर, २०२० च्या मासिक प्रगती अहवालावरुन राज्यातील कुपोषणाची श्रेणीनिहाय माहिती पुढीलप्रमाणे-

| महिना | एकूण वजन घेतलेली बालके | सर्व साधारण | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| मार्च, २०२० | ५७७१६५५ | ५०९०६८२ | ५७१००७ | १०९९६६ | १.९१ |
| डिसेंबर, २०२० | ६०८०१७७ | ५४६५०७८ | ५२५९४८ | ८११५१ | १.३७ |

माहे मार्च, २०२० च्या तुलनेत माहे डिसेंबर, २०२० मध्ये कुपोषणाचे प्रमाण कमी झालेले आहे. तसेच राज्यात टाळेबंदीच्या काळात दिला जाणारा THR अंतर्गत घरपोच आहाराच्या दर्जाबाबत कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत माहे डिसेंबर, २०१९ व माहे डिसेंबर, २०२० च्या मासिक प्रगती अहवालावरुन राज्यातील कुपोषणाची श्रेणीनिहाय माहिती खालीलप्रमाणे-

| महिना | एकूण वजन घेतलेली बालके | सर्व साधारण | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर, २०१९ | ५८५२२१९ | ५११०५६९ | ६१७४६५ | १२४९८५ | २.१२ |
| डिसेंबर, २०२० | ६०८०१७७ | ५४६५०७८ | ५२५९४८ | ८११५१ | १.४७ |

(३) हे खरे नाही.

राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत मासिक प्रगती अहवालावरुन माहे मार्च, २०२० व माहे डिसेंबर, २०२० या कालावधीत पुढीलप्रमाणे लाभार्थ्यांना आहाराचा लाभ घेतला आहे.

| महिना | ६ महिने ते ३ वर्ष वयोगट बालके | ३ ते ६ वयोगट बालके | गर्भवती व स्तनदा माता |
|---|---|---|---|
| मार्च, २०२० | २९१०२५९ | २१४२८५६ | १०७७०२३ |
| डिसेंबर, २०२० | ३०६७३९५ | ३५४२७४३ | ११०३८३५ |

सद्य:स्थितीत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील ३०६७३९५ व ३ ते ६ वर्ष वयोगटातील ३५४२७४३ एवढया लाभार्थ्यांना तसेच ११०३८३५ गर्भवती व स्तनदा माता यांनी आहाराचा लाभ घेतला आहे.

(४) राज्यात ग्रामीण, आदिवासी भागात अंगणवाडी स्तरावर ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यास २०१७ पासून निर्णय घेण्यात आलेला आहे. तथापि, माहे मार्च, २०२० पासून कोवीड-१९ ची साथ सुरु झाल्यामुळे अंगणवाडी केंद्र बंद असल्यामुळे जुलै, २०२० पासून होमबेस ग्राम बाल विकास केंद्र (Home VCDC) सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. सद्यस्थितीत राज्यात ५५८५ सॅम बालकांना होमबेस व्हीसीडीसीचा लाभ देण्यात येत आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) संपूर्ण राज्यात अंगणवाडीस्तरावर ग्राम बाल विकास केंद्रे सुरु करण्यात आली असून मार्च, २०२० पासुन कोवीड-१९ ची साथ सुरु झाल्यामुळे ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना कोवीड-१९ ची साथ अधिक वाढू नये म्हणून अंगणवाडी केंद्र बंद करण्यात आले आहे. तथापि, मार्च, २०२० पासून ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहार अंगणवाडीत एकत्रित येऊन खाल्ल्याने कोवीड-१९ चा प्रसार अधिक वाढू नये यासाठी THR अंतर्गत घरपोच आहार सुरु करण्यात आलेला आहे. तसेच ६ महिने ते ३ वर्षाची बालके व गरोदर, स्तनदा माता यांना नियमित THR सुरु ठेवण्यात आला आहे. त्याचप्रमाणे माहे जुलै, २०२० पासून बालकांच्या घरातच ग्राम बाल विकास केंद्रे (होम बेस VCDC केंद्र ) सुरु आहेत व त्यामध्ये EDNF आहाराचा पुरवठा सुरु आहे. ज्या बालकांच्या कुपोषणाच्या स्थितीमध्ये EDNF देऊन सुध्दा सुधारणा होत नाही, अशा बालकांना NRC व CTC सेंटरमध्ये दाखल करण्यात येते.

-----------------

## अंधेरीतील (मुंबई) मरोळ येथील राज्य कामगार विमा रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(१०) * २२८५६ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरोळ (मुंबई) येथील राज्य कामगार विमा रूग्णालयास लागलेल्या आगीच्या घटनेस दोन वर्ष झाली असून सदर रुग्णालयाचे दुरूस्ती व नुतनीकरणाचे काम गेल्या दोन वर्षांपासून एन.बी.सी.सी. इंडिया या कंपनीमार्फत सुरू असून अद्यापही काम पूर्ण न झाल्याने रूग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त आयुक्त यांनी रुग्णालय त्वरीत सुरु करण्याचे आश्वासन माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले असून सदरहू रूग्णालयाच्या दुरूस्ती व नुतनीकरणाचे काम माहे जून, २०२० पर्यंत पूर्ण होण्याचे अपेक्षित असताना अद्याप ते पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू रूग्णालय बंद असल्यामुळे रूग्णांनी खाजगी रूग्णालयात उपचार घेतल्यास त्याची प्रतिपूर्ती करण्यात येणार असल्याचे जरी शासनाकडून जाहिर केले असले तरी प्रत्यक्षात मात्र मागील सहा ते आठ महिन्यांपासून ज्या रूग्णांनी खाजगी रूग्णालयात उपचार घेवून वैद्यकीय देयके प्रतिपूर्तीसाठी सादर केली असता सदरहू देयकांची प्रतिपूर्ती राज्य शासनाने करायची की केंद्र शासनाने करायची याबाबत वाद निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी रूग्णालयात उपचार घेतल्या प्रकरणी गत दोन वर्षात एकूण किती कामगारांनी वैद्यकीय देयके प्रतिपूर्तीकरिता सादर केली आहेत व त्यातील किती कामगारांच्या वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती करण्यात आलेली आहे व ज्या कामगारांच्या वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती अद्याप प्रलंबित आहे, त्याबाबतची प्रतिपूर्ती किती कालावधीत करण्यात येणार आहेत,

(५) तसेच, सदरहू रूग्णालयाच्या दुरूस्ती व नुतनीकरणाच्या कामाच्या विलंबास जबाबदार असणा-या संबंधित कंपनीवर कारवाई करण्याबाबत केंद्र शासनास तात्काळ कळवून सदरहू रूग्णालय त्वरित सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मरोळ, अंधेरी येथील कामगार रुग्णालय हे केंद्र शासनाच्या राज्य कामगार विमा महामंडळामार्फत चालविण्यात येत आहे.

(२) कोरोना महामारी प्रादुर्भावामुळे सदर रुग्णालयाच्या दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम प्रलंबित आहे.

(३) हे खरे नाही.

(४) गेल्या दोन वर्षात एकूण ४९५ कामगारांनी वैद्यकीय देयके प्रतिपुर्ती करीता सादर केलेली असून त्यापैकी ४४८ देयकांची वैद्यकीय प्रतिपुर्ती करण्यात आली असल्याचे व ४७ वैद्यकीय देयके प्रतिपुर्ती संबंधित कागदपत्रांच्या अभावी अद्याप प्रलंबित आहेत.

(५) राज्य कामगार विमा महामंडळाकडे याबाबत विचारणा केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील स्व. इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयास जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत

**(११) * २०७१६ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील स्व. इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयास उल्हासनगरच्या धर्तीवर जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना याबाबतचा अहवाल देण्याचे निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या रुग्णालयास २०० खाटांची मंजुरी देऊन ८ वर्षे झाली असूनही सुविधा अद्याप उपलब्ध झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणी संदर्भात तसेच सदर रुग्णालयात २०० खाटांची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकरणी दिनांक १४.०१.२०२१ रोजी मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. याबाबत तपासणी करण्यात येत असून, रुग्णालयाचे बांधकाम व विस्तारीकरणासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे बांधकाम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

स्व.इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी या रुग्णालयाचे २०० खाटांचे बांधकाम झालेले नाही, हे खरे आहे. परंतु रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.
(४) दिनांक १७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या बृहत आराखडयामध्ये या रुग्णालयाचे १०० खाटांवरुन २०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन झाले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा (जि.भंडारा) येथील जिल्हा रुग्णालयात लागलेल्या आगीमुळे बालकांचा झालेला मृत्यू

**(१२) * २०३९७ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण**

**ग्रामीण), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.सुनील राणे (बोरीवली), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा (जि.भंडारा) येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील विशेष नवजात बालक केअर युनिटमध्ये (एसएनसीयु) आग लागल्याने १० नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दिनांक ९ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाचे फायर ऑडीट झाले नसल्यामुळे तसेच अग्नी सुरक्षा यंत्रणेत त्रुटी व इन्क्युबेटरच्या वार्षिक तपासणीसाठी तांत्रिक ज्ञान असणाऱ्या अधिकाऱ्या ऐवजी फेबर सिंदुरी या कंपनीने एम. कॉम. उत्तीर्ण कर्मचारी नेमला असल्याने इन्क्युबेटरच्या स्फोटामुळे नवजात बालकांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयाच्या आग प्रतिबंधक उपाययोजनेकरीता १ कोटी ५२ लाख रुपये अंदाजपत्रकाचा प्रस्ताव संबंधितांकडे पाठविण्यात आला असून, उक्त प्रस्तावाला माहे डिसेंबर, २०२० पर्यंत मंजूरी देण्यात आली नसून सदर रुग्णालयात आगीची सूचना देण्यासाठी लावले जाणारे स्मोक अलार्म नसल्याची बाब माहितीच्या अधिकारातून माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दुर्घटनेला ४८ तास होऊन गेल्यानंतरही गुन्हा दाखल करण्यात आला नाही तसेच या प्रकरणी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने नेमलेल्या समितीने घटना घडून १२ दिवस झाल्यानंतरही अहवाल दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर रुग्णालयास मा.मुख्यमंत्री यांनी भेट दिल्यानंतर सर्व सरकारी रुग्णालयाचे फायर ऑडीट व इलेक्ट्रीक ऑडीट करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दोषी असलेल्या रुग्णालयांच्या संबंधित व्यवस्थापन अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यासह या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून राज्यातील सर्व शासकीय तसेच खाजगी रुग्णालयांचे फायर ऑडीट व इलेक्ट्रीक ऑडीट करण्यासंदर्भात व सदर दुर्घटनेत जीव गमावलेल्या बालकांच्या कुटुंबीयांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हा रुग्णालय भंडारा येथील एसएनसीयु मध्ये दिनांक ०९/०१/२०२१ रोजी ऑऊटबॉर्न कक्षामध्ये १० नवजात शिशु व इनबॉर्न कक्षामध्ये ७ नवजात शिशु दाखल होते.  यापैकी इनबॉर्न युनिटमधील ७ नवजात शिशुंना वाचविण्यात

यश आले परंतु आऊटबॉर्न युनिट मधील १० बालकांचा मृत्यु झाला.

(२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, भंडाराचे फायर ऑडिट करण्यात आले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे परंतू फेबर सिंदुरी या कंपनीने इन्क्युबेटरच्या तपासणीसाठी बायो इंजिनियर पात्रता धारक व्यक्तीची नियुक्ती करणे आवश्यक असतांना आयटीआय/अप्रशिक्षीत योग्य पात्रताधारक व्यक्तीची नियुक्ती केली नसल्याची बाब अंशत: खरी आहे.

(३) दिनांक ०१ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा रुग्णालय,भंडारा येथे Fire Fighting System खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.त्यानंतर भंडारा जिल्हा रुग्णालयाच्या आग प्रतिबंधक उपाय योजनेसाठी रु. १,५२,४४,७८३/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव उपसंचालक आरोग्य सेवा,नागपूर यांचे पत्र दिनांक ११/०६/२०२० अन्वये प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २०/०९/२०१९ अन्वये, सा.बां.विभागाचे तांत्रिक मान्यता घेऊन प्रस्ताव सादर करण्याबाबत या आयुक्तलयाचे दि. १५/०९/२०२० च्या पत्रान्वये, जिल्हा शल्य चिकित्सक, भंडारा यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार उपसंचालक आरोग्य सेवा,नागपूर यांचे दि. ०९/०२/२०२१ च्या पत्रान्वये, रु. १,९२,९५,८४४/- इतक्या रक्कमेचा सुधारित प्रस्ताव आयुक्तालयास सादर केला आहे. आयुक्तलयाने दि. १०/०२/२०२१ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव शासनास सादर केला असून सदर प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.तसेच सदर रुग्णालयात स्मोक अलार्म बसविण्यात आलेले नव्हते, ही बाब खरी आहे.

(४) सदर प्रकरणी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला असून तो दि.२०/०१/२०२१ रोजी सादर करण्यात आला आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) १) सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या थेट देखरेखीखाली चौकशी समितीने चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे.

२) या अहवालानुसार जिल्हा शल्यचिकित्सक यांना निलंबित करण्यात आले आहे व कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेले बालरोगतज्ञ व २ स्टाफ नर्स यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत. तसेच SNCU Incharge staff Nurse यांना निलंबीत करण्यात आले. तसेच अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, यांची

अकार्यकारी पदावर बदली करण्यात आली आहे.

३) सर्व शासकीय रुग्णालयांचे फायर ऑडीट करुन घेण्यासाठी तसेच फायर सेफ्टीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## कळंब (जि.उस्मानाबाद) येथील उपजिल्हा रुग्णालयात सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(१३) * २३५८९ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.उस्मानाबाद) येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊनही या रुग्णालयात आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात खामगाव -पंढरपूर -कळंब लातूर -कळंब-ढोकी या रस्त्याचे काम सुरु असून रस्त्यावर सतत अपघात होत असल्याने रक्ताची निकड लक्षात घेऊन कळंब येथे रक्तपेढी होण्याचीही मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी शासनाकडे पत्रव्यवहार करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) उपजिल्हा रुग्णालय कळंब येथे रक्त साठवण केंद्र दि. ०२.०९.२०१६ पासून कार्यान्वीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर आणि उपनगरात शस्त्रक्रियेद्वारे महिलांची प्रसुती होण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(१४) * २३३४६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरात शासकीय आणि खाजगी रुग्णालयात गेल्या काही वर्षात शस्त्रक्रियाद्वारे (सिझेरियन) महिलांची प्रसुती करण्याचे प्रमाण वाढले असल्याचे निरीक्षण "राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणात" (एनएफएचएस-५) नमूद केले असल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एनएफएचएस-५ सर्वेक्षणात नोंदविण्यात आलेल्या निरीक्षणाचे स्वरुप काय आहे व त्यात कोणती प्रमुख कारणे नमुद केली आहेत,

(३) असल्यास, खाजगी व शासकीय रुग्णालयामध्ये शस्त्रक्रियाद्वारे (सिझेरियन) महिलांची प्रसुती करण्याचे वाढते प्रमाण रोखण्याकरीता दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये तज्ञांची समिती स्थापन केली असून सदर समितीच्या शिफारशी शासनाच्या विचाराधीन असल्याने खाजगी रुग्णालयातील उपचारावरील दर नियंत्रणाबाबत दिनांक ३० ऑगस्ट, २०२० रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शस्त्रक्रियाद्वारे (सिझेरियन) महिलांची प्रसुती करण्याचे वाढते प्रमाण रोखण्याकरीता तज्ञांची समितीने केलेल्या शिफारशीवर अमंलबजावणी करण्यासह जादा दर आकारणी करणा-या खाजगी रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणात एनएफएचएस-५ नुसार सिझेरियन प्रसुतीमध्ये मुंबई शहर व उपनगरात वाढ झालेली दिसून येते.

(२) सन २०१९-२० या वर्षाकरिता असलेल्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणात (एनएफएचएस-५) च्या अहवालाचा तपशिल पुढीलप्रमाणे -

| Indicator | Mumbai | | Mumbai Suburban | |
|---|---|---|---|---|
| | NFHS-5 | NFHS-4 | NFHS-5 | NFHS-4 |
| Birth in a PVT health facility that were delivered by c section (&) | 39.1 | 37.6 | 41.9 | 30.3 |
| Birth in a public health facility that were delivered by c section (%) | 23.8 | 23.2 | 25.1 | 11.9 |

(३) होय, हे खरे आहे.

(४) समितीचा अहवाल शासनास अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खानिवडे (ता. वसई, जि. पालघर) येथील ग्रामीण रुग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याबाबत

**(१५) * २२३९४ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानिवडे (ता. वसई, जि. पालघर) येथे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामाकरीता प्रशासकीय मान्यता देऊन कार्यान्वित करणे व त्या अनुषगांने पद भरती व इमारत भाडे अदा करणेस निधी उपलब्ध होण्याबाबतचे प्रकरण मागील ६ वर्षापासून सहसंचालक, आरोग्यसेवा यांचे स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रुग्णालयाच्या अभावी स्थानिकांची गैरसोय होत असून त्यांचा वेळ व आर्थिक अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालय तातडीने पुर्ण क्षमतेने कार्यान्वित

होण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
सद्यस्थितीत खानिवडे (ता.वसई, जि.पालघर) येथे आरोग्य उपकेंद्र कार्यरत असून सदर उपकेंद्रामार्फत आरोग्य उपकेंद्रात उपलब्ध असलेल्या प्राथमिक स्तरावरील सर्व प्रकारच्या आरोग्य सेवा परिसरातील नागरिकांना पुरविण्यात येत आहेत.
(३) दिनांक २८.०७.२०२० रोजी वन विभागाकडून ग्रामीण रुग्णालय बांधकामासाठी जागा प्राप्त झाली आहे. त्यानुसार बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमेद प्रकल्पातील कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त न करता प्रकल्प पूर्ववत कायम ठेवण्याबाबत

**(१६) * २११७८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय ग्रामीण जिवनोन्नती अभियानातंर्गत राज्यातील उमेद प्रकल्पाचे खाजगीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उमेद प्रकल्पात पूर्वी पासून कार्यरत अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवा समाप्त न करता प्रकल्प पूर्ववत कायम ठेवावा या मागणीसाठी चंद्रपूर जिल्हयात माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये २० हजार कर्मचाऱ्यांचा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला तसेच यासंदर्भात विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री व सर्व संबंधितांना लेखी निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार उमेद प्रकल्पात पूर्वीपासून कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त न करता प्रकल्प पूर्ववत कायम ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत कंत्राटी पध्दतीने कार्यरत सुमारे २९०० कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणेच कार्यपध्दती अनुसरुन अभियानामार्फत पुनर्नियुक्त्या देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला असून त्यानुसार कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ येथील आमडापूर लघु प्रकल्पात बांधण्यात आलेले मुख्य कालवे बंद अवस्थेत असल्याबाबत

**(१७) * २३६२९ श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथे शासनाने कोटयावधी रुपये खर्च करुन शेतक-यांच्या हिताकरिता बांधण्यात आलेल्या आमडापूर लघु प्रकल्पातून आमडापूर, नारळी, टाकळी, घमापूर, इसापूर, फुलसावंगी, राहूर, शिरपुल्ली, चिल्ली (ई), चिंचोली, काळी (टेंभी) आदि गावांना पाणी पुरवठा करण्याकरिता बांधण्यात आलेला मुख्य कालवा बंद अवस्थेत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर कालव्यांची साफसफाई करण्यासाठी चार लाख रुपयाचे कंत्राट घेऊन कंत्राटदाराने सदर कालवे सफाई केली नसल्याने परिसरातील शेतक-यांना या धरणाचा काहीच उपयोग होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर कालव्यांची सफाई करुन शेतक-यांना पाणीपुरवठा करण्यासह यांस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे नाही,

या प्रकल्पाअंतर्गत उमरखेड तालुक्यातील अमडापुर, नारळी, टाकळी, ईसापुर, चिंचोली ही गावे लाभक्षेत्रात येतात व महागांव तालुक्यातील फुलसावंगी, चिल्ली (ई), काळी टेंभी ही गावे लाभक्षेत्रात येतात. तसेच राहुर, शिरफुली ही गावे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये येत नसल्यामुळे या गावांना सिंचनाचा लाभ देता येत नाही. घमापुर हे गाव प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येत नसून बुडीत क्षेत्रात येत असल्याने कालव्याद्वारे सिंचनाचा लाभ या गावास मिळत नाही. या प्रकल्पास एकूण १४.७४ कि.मी. लांबीचा कालवा असून कि.मी. ८ पर्यंत पूर्ण काम झालेले आहे. उर्वरीत ६.७४ कि.मी. चे काम प्रगतीपथावर आहे. कि. मी. ५ ते कि. मी. ८ मधील वितरण व्यवस्थेची काही कामे शिल्लक असल्यामुळे कि. मी. ५ पर्यंतच्या क्षेत्रासाठी सिंचनाचे जाहीर प्रगटन करण्यात येते व कि. मी. ५ पर्यंत कालवा प्रवाहीत करण्यात येत आहे. यामध्ये अमडापुर, नारळी, टाकळी, ईसापुर व फुलसावंगी या गावांना सिंचनाचा लाभ प्राप्त होतो. सदर कालव्यावर ५७९.२८ हे. ऐवढे महत्तम सिंचन होत आहे.

(२) हे खरे नाही.

साफसफाईची कुठल्याही प्रकारची निविदा काढण्यात आलेली नाही.

(३) सदर प्रकल्प हा बांधकामाधीन असल्याने कालवे साफसफाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे काटेभोगाव (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील पाझर तलावाच्या दुरुस्ती कामाबाबत

**(१८) * २१३४६ श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर) (करवीर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काटेभोगाव (ता.पन्हाळा, जि.कोल्हापुर) येथे सन २०११-१२ मध्ये पाझर तलावाच्या दुरुस्ती कामास शिवकालीन योजनेतून नऊ लाख रूपये खर्च झाला असून सध्या मृद व जलसंधारण विभागाने ५६ लाख ६७ हजार निधी मंजूर करून सदर तलावाचे काम सुरु केले असुन यामध्ये तलावाच्या जुन्या भरावावर ३०

से.मी. चा मातीचा थर, त्यावर ५०० मायक्रॉनचा कागद टाकून पुन्हा ३० से.मी. मुरमाचा थर टाकून दगडी पीचिंग (अश्मपटल) करणे असे काम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिल्याच पावसाने तलावाचे दगडी पीचिंग, मुरुम तलावात घसरून आले असल्याने तलावाच्या खालील बाजूस असणाऱ्या शेकडो एकर शेतीचे नुकसान होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मृद व जलसंधारण विभागाने सदर ग्रामपंचायतीला धोका नसल्याचे पत्राने कळविले असुन जरी धोका नसला तरी ५६ लाख ६७ हजार रुपयांचा निधी खर्च होऊनही तलावाचे काम मजबूत झाले नसल्याने शासनाच्या निधीचा अपव्यय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कामाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) नाही. दिनांक ०३/०६/२०२० रोजी अश्मपटलाचे काम प्रगतीपथावर असतानाच चक्रीवादळाच्या नैसर्गिक आपत्तीमुळे अचानक कार्यक्षेत्रावर अतिवृष्टी झाली. त्यामुळे प्रगतीत असलेले अश्मपटल व मुरुम पाण्यामध्ये खाली पसरलेला आहे. परंतू सद्य:स्थितीत पाणीसाठा पुर्ण क्षमतेने झाल्यामुळे काम थांबलेले आहे. त्यामुळे शासनाच्या निधीचा कोणताही अपव्यय झालेला नाही.

(४) व (५) अचानक आलेल्या चक्रीवादळ व अतिवृष्टीमुळे घटना घडली आहे. तसेच अद्याप निविदेमधील काम पुर्ण झालेले नाही. त्यामुळे तलावातील पाणी पातळी कमी झाल्यावर तलावामध्ये घसरलेला मुरुम व दगड काढून नव्याने अश्मपटलाचे काम करून घेण्यात येणार आहे.

----------------

## पुणे जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत झालेली रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(१९) * २१५९४ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या तीन आर्थिक वर्षात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत रस्ता सुधारण्याची कामे झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू सर्व कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी तीन वर्षात झालेल्या सर्व कामांची फेरतपासणी राज्य दक्षता व नियंत्रण पथकाकडून करावी अशी मागणी मुख्य अभियंता, पुणे यांना माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाच्या कामांची फेरतपासणी राज्य गुणवत्ता पथकाने केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) पुणे जिल्हयात सन २०१७-१८,सन २०१८-१९, व सन २०१९-२० या तीन आर्थिक वर्षात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ३७८ कामे मंजूर झाली त्यापैकी ११६ कामे पूर्ण असून १९१ कामे प्रगतीपथावर आहेत व ७१ कामे निविदा स्तरावर आहेत.
(२) व (३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रचलित धोरणानुसार योजनेंतर्गत प्रगतीतील कामांची तपासणी SQM व SSQM यांचे द्वारे करण्यात येते. सदर तपासणी काम सुरू झाल्यापासून अंतिम होईपर्यंत चार वेळा कामाच्या दर्जाबाबत तपासणी करण्यात येते. सदर निकषानुसार पुणे जिल्हयातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्याची कामे समाधानकारक असल्याचे निष्पन्न झाले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) येथील जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(२०) * २३९७६ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) येथील मुलींच्या जिल्हा परिषद शाळेची इमारत धोकादायक झाली असून गुणात्मक परिक्षण करण्यात यावे असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेत १३४५ मुली शिक्षण घेत असून २७ शिक्षक कार्यरत असताना २८ वर्ग खोल्यांपैकी १३ वर्गखोल्या नादुरुस्त आहेत, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, या शाळेच्या इमारतीचे गुणात्मक परिक्षण करुन पुनर्बांधणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर शाळेतील वर्गखोल्या दुरुस्तीसाठी सन २०२०-२१ करिता जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत निधीची मागणी केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वडापूर (ता.दक्षिण सोलापूर,जि.सोलापूर) येथील भीमा नदीवरील बॅरेजेस बांधण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत

**(२१) * २४३७८ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडापूर (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील भीमा नदीवरील बॅरेजेस बांधण्याच्याकामासाठी मंजूरी मिळालीअसून सदर बंधाऱ्यामुळे उजनी धरणातून वाहून जाणारे पाणी अडविण्याकरिता व बंधाऱ्याच्या बांधकामामुळे सोलापूर व मंगळवेढा तालुक्यातील लाखो एकर शेती सिंचनाखाली येणार असल्याने सदरहू बंधाऱ्याकरिता एक कोटी रुपयांची तरतूद करण्याकरिता लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने बंधाऱ्याच्या बांधकामास निधी उपलब्ध करुन बंधाऱ्याचे बांधकाम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच बंधारा केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय,

ऑक्टोबर, २०२० मध्ये सदर निवेदन प्राप्त आहे.

(२) हिवाळी अधिवेशन २०२० मध्ये को.प.बंधारा वडापूर (कुसूर), ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर या अस्तित्वातील को.प. बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रूपांतरण करण्याच्या विशेष दुरूस्ती कामास मा.विधानमंडळाच्या निदर्शनास आणून त्याद्वारे लाक्षणिक तरतूद करण्यात आली आहे. तसेच आर्थिक वर्ष सन २०२१-२२मध्येसदर प्रकल्पास आर्थिक तरतूद करून निधी उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ऐतिहासिक किल्ल्यांवर होणारे गैरप्रकार रोखण्याबाबत करावयाच्या उपाययोजना

**(२२) * २१५४६ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऐतिहासिक किल्ले पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येत असल्याने याठिकाणी झेंडा लावणे किंवा उत्सवाच्या वेळी रांगोळी काढणे यासाठी सुध्दा पुरातत्व विभागाची परवानगी घ्यावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई (जि.पालघर) येथील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या समुद्र किनारपट्टीलगत असलेल्या वसईच्या किल्ल्यामध्ये महिला व मुलींसोबत गैरवर्तन, मद्यपान, धुम्रपान व इतर अंमली पदार्थांचे सेवन, विवाहपूर्व छायाचित्रणाच्या नावाखाली होत असलेले गैरप्रकार व विनापरवानगी चित्रीकरण अशा व इतर विविध गैरप्रकार तसेच अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, रायगड (जि.रायगड) किल्ल्यावर विवाहपुर्व करण्यात येणारे चित्रीकरण करण्याचे प्रकार होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून ऐतिहासिक स्थळी जाऊन विवाहपूर्व छायाचित्रण करण्याची संकल्पना वाढीस लागल्यामुळे शिवभक्त नाराजी व्यक्त करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाबी विविध दुर्गप्रेमी संस्था - संघटना आणि इतिहास अभ्यासक व पर्यटन प्रेमी यांच्याकडून सातत्याने निदर्शनास आणून दिल्या असून या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पवित्र वास्तूंचे महत्त्व, संवर्धन आणि संरक्षण करण्याच्या दृष्टीने भारतीय पुरातत्व विभाग आणि स्थानिक महानगरपालिका व पोलीस शासन यांच्या समन्वय आणि सहकार्याने वसईच्या किल्ल्यामध्ये भक्कम सुरक्षा यंत्रणा निर्माण करण्याची मागणी वसई तालुक्यातील सामाजिक कार्यकर्त्यांनी लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पुरातत्व विभागाच्या नियमाचे उल्लंघन करुन ऐतिहासिक किल्यांवर होत असलेल्या गैरप्रकारांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, त्याअनुषंगाने यांस जबाबदार असण्या-या संबधितांवर कारवाई करणेसह राज्यातील ऐतिहासिक किल्यांवर होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) भारतीय पुरातत्व विभागाने संबंधित स्थानिक प्राधिकरणास पुरेशी सुरक्षा पुरवण्याबाबत कळवलेले आहे. तसेच किल्ल्यांवरील गैरवर्तन रोखण्याकरीता एसआयएसचे सुरक्षा रक्षक व इतर कर्मचारी नियुक्त केले आहे. केंद्र संरक्षित किल्ल्यांच्या सभोताली होणा-या अतिक्रमण हटविण्यासाठी भारतीय पुरातत्व विभागाने सूचना निर्गमित केलेल्या असून अनधिकृत बांधकामाबाबत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल केल्या आहेत. तसेच स्थानिक प्रशासनास याबाबत कारवाई करण्याबाबत विनंती केली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील करोना लसीकरणाच्या प्रक्रियेबाबत

**(२३) * २१५८७ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.राजेश पवार (नायगांव), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सिरम इन्स्टिट्युटची “कोव्हिशिल्ड” व भारत बायोटेकची “कोव्हॅक्सीन” या दोन लसींना आपत्कालीन वापरासाठी मान्यता दिल्यानंतर प्रथम टप्प्यात आरोग्य कर्मचारी, पोलीस व प्राधान्यक्रमानुसार तीन कोटी नागरीकांना मोफत देण्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास जाहीर केल्यानुसार राज्यातील बारा कोटी जनतेला मोफत लस देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मा. आरोग्य मंत्री यांनी दिनांक ५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात करोना लसीकरणाची मोहिम सुरु झाली असून लसीकरणाबाबत कांही बनावट गट कार्यरत झाले असून याबाबतचे मेसेज प्रसार माध्यमाद्वारे पाठविण्यात येत आहेत तसेच लस लवकर मिळण्यासाठी नोंदणी करण्यासाठी नागरीकांचे आधार क्रमांक इत्यादीची माहिती घेवून नागरीकांची आर्थिक फसवणूक करण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लसीकरणासाठी संबंधित व्यक्तीची नोंदणी करणे, ओळख पटविणे आणि लसीकरण झाल्याची नोंद करणे इत्यादी बाबीं डिजिटल पध्दतीने

करण्यासाठी केंद्रीय आरोग्य विभागाने 'कोविन' ॲप निर्माण केले आहे परंतु हे ॲप पूर्णत: इंटरनेटवर चालत असुन राज्यातील १८०० प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी सुमारे ३०० केंद्रावर इंटरनेट सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले असून अनेक जिल्हयांमध्ये देखिल इंटरनेट सुविधा व इतर तांत्रिक अडचणी येत असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या लसीकरण सराव फेरीतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लसीकरण केंद्राची निवड करतानाच वीज आणि इंटरनेटची सुविधा असावी असा निकष आहे तथापि राज्यातील ३०० केंद्रावर इंटरनेटची सुविधा नसल्यामुळे दुर्गम भागातील इंटरनेट सुविधा नसलेल्या केंद्रांना वगळून त्याजवळील केंद्राची निवड लसीकरणासाठी करावी लागणार असल्याची माहिती आरोग्य आयुक्तालयाच्या संचालक यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील आरोग्य कर्मचारी आणि फ्रंटलाइन वर्कर अशा एकूण १८ लाख ४५ हजार व्यक्तींनी कोरोनाची लस मिळावी म्हणून नोंद केली असून आतापर्यंत किती व्यक्तींनी कोरोनाची लस देण्यात आली व उर्वरीत कर्मचारी यांना किती दिवसात लस देण्यात येणार आहे तसेच राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना कोरोनाची लस केव्हापासून देण्यात येणार आहे व लसीकरण पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,

(६) असल्यास, लसीकरणाबाबत कार्यरत असलेले बनावट गट यांच्यावर कारवाई करण्यासह लसीकरणाचे काम सुरळीत व सुयोग्य पध्दतीने होण्याच्या दृष्टीने सध्या निर्माण होत असलेल्या इंटरनेटसह इतर सर्व समस्या विनाविलंब दूर करुन राज्यातील जनतेला मोफत लस देण्याबाबत शासनाने निश्चित केलेल्या मापदंडानुसार नियोजन करण्यासाठी तसेच याकरीता निधीची तरतूद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने दोन लसींना आपत्कालीन वापरासाठी मान्यता दिलेली आहे व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार लसीकरण कार्यान्वीत आहे.

(२) याबाबत कोणतीही तक्रार अद्यापपर्यंत प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आवश्यक सुविधा असलेल्या

ठिकाणी दि. १६ जानेवारी, २०२१ पासून कोवीड लसीकरण सुरु करण्यात आले आहे.

सुरुवातीच्या काळात कोवीन ॲपमध्ये तांत्रिक समस्या निर्माण झाल्या होत्या. त्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला असून केंद्र शासनाकडून तांत्रिक समस्यांचे निराकरण करण्यात येत आहे.

(४) केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार वीज व इंटरनेट उपलब्ध असलेल्या ठिकाणी लसीकरण सत्र आयोजित करण्यात येत आहे.

(५) नोंदणीकृत आरोग्य कर्मचारी व फ्रंटलाईन वर्कर पैकी एकूण ९,१७,४९८ यांना दि. २१.०२.२०२१ पर्यत लसीकरण करण्यात आले आहे. केंद्र शासनाने हेल्थ केअर वर्कर्सना पहिला डोस दि. २५.०२.२०२१ पर्यत व फ्रंट लाईन वर्कर्सना पहिला डोस माहे मार्च, २०२१ च्या पहिल्या आठवडयापर्यत देण्याविषयी कळविले आहे. राज्यातील सर्व सामान्य नागरिकांना कोरोनाची लस देण्याविषयी अद्यापपर्यत केंद्र शासनाकडून कोणत्याही मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या नाहीत.

(६) बनावट गट कार्यरत होऊन याबाबत मेसेजेस पाठविण्यात येत असल्याबाबतची अद्याप कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. कोवीन ॲपमधील तांत्रिक समस्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येऊन तांत्रिक समस्यांचे निराकरण करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत हेल्थ केअर वर्कर्स व फ्रंट लाईन वर्कस यांच्या करीता केंद्र शासनाकडून राज्याला दोन प्रकारच्या लसी मोफत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्यात परिचारिका प्रशिक्षणाकरिता पतीचे संमतीपत्र आवश्यक असल्याची अट वगळण्याबाबत

**(२४) * २०७७८ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सदा सरवणकर (माहिम),**

**श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत स्त्री सहाय्यक प्रसविका (एएनएम) व सामान्य परिचारिका प्रसविका (जीएनएम) या पदांच्या प्रशिक्षण प्रवेशासाठी निवड करण्यापुर्वी प्रशिक्षण कालावधीसाठी पतीचे संमतीपत्र सादर करण्याची अट घालण्यात आली असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या स्त्री उमेदवारांस परिचारीका प्रशिक्षणाकरीता कुटूंबातून पाठींबा मिळणार नाही त्यांना आरोग्यविषयक सेवा देण्याची इच्छा असतांनाही त्यांना प्रशिक्षण घेता येणार नसल्यामुळे अशा इच्छूक स्त्री उमेदवार प्रशिक्षण घेण्यापासून पर्यायाने शासकीय नोकरी मिळण्यापासून वंचित रहातील, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "सदर अट संयुक्तिक नसून त्यामागील नेमके कारण समजून घेऊन, त्यानुसार ही अट बदलण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला जाईल" असे संचालक, आरोग्य आयुक्तालय यांनी माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान सांगितले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अट बदलण्यासाठी आरोग्य संचालनालयाकडून माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

स्त्री सहाय्यक प्रसविका (एएनएम) व सामान्य परिचारीका प्रसविका (जीएनएम) या पदाच्या प्रवेशासाठी विवाहित स्त्रीयांना पतीचे संमतीपत्र सादर करण्याची अट पूर्वीपासूनच अंतर्भूत होती.

(२) हे खरे नाही.

विवाहित महिलांकडून कौटुंबिक अडचणीस्तव प्रशिक्षण अर्धवट सुटत असल्याने संबंधित महिलेचे प्रशिक्षण पूर्ण न होणे व त्या जागेवर दुसरी प्रशिक्षणार्थी घेता येत नसल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित विवाहित प्रशिक्षणार्थीचे शिक्षण पूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून यापूर्वीच प्रशिक्षणार्थीच्या प्रवेशासाठी ही अट टाकण्यात आली होती.

(३) हे खरे आहे.

(४) आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून सदर अट वगळण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या ५०६ रुग्णालयांत अग्निरोधक यंत्रणा उपलब्ध नसल्याबाबत

**(२५) * २०४१७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सुमारे ५०६ रुग्णालयात अग्निरोधक यंत्रणा उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये निदर्शनास आले असून याबाबत सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे वारंवार तक्रार करून सुद्धा मागील १० वर्षांत यासंदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर शहर व जिल्हयातील महत्वाच्या रुग्णालयामध्ये सुपर स्पेशालिटी वगळता अन्य रुग्णालयांमध्ये अद्यापही अग्निशमन यंत्रणा कार्यरत नसुन नाशिक व मालेगाव जिल्हा रूग्णालयांसह १८ ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयाचे गेल्या २ वर्षापासून फायर ऑडिट केले नसल्याचे तसेच नागपूर शहरातील डागा स्मृती रुग्णालयात अग्निशमन व्यवस्था योग्यरित्या कार्यरत नसून येथील शिशु केअर युनिटमध्ये अग्निशमन व्यवस्थाच नसून येथील प्रसूती कक्षाबाहेर कुठलीच सुरक्षेची व्यवस्था नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक आरोग्य व ग्रामविकास विभागांतर्गत येणाऱ्या आरोग्य उपकेंद्रामधील औषधांचा दर्जा, आरोग्य कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रुग्णालयातील व्यवस्था व तेथील स्वच्छता या संदर्भात नियमित तपासणी होत नसल्याचे सुद्धा निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आरोग्य विभागाची फायर एनओसी नसलेली रुग्णालये ४८ तासांत सील करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दोन वर्षांपूर्वी दिले असूनही अद्यापपर्यंत कोणत्याही रुग्णालयांवर कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संदर्भात राज्य शासनाकडून श्वेतपत्रिका काढण्यात येणार आहे काय तसेच अग्निशामक यंत्रणा योग्यरितीने काम करीत नसलेल्या व फायर एनओसी नसलेल्या रुग्ण्यालयांवर तसेच त्यास जबाबदार असण्याऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह राज्यातील रुग्णालयांचे फायर ऑडीट करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत एकूण ५६७ रुग्णालयापैकी ३२३ आरोग्य संस्थांचे फायर ऑडीट करण्यात आले असून १७० संस्थाकरीता अंदाज आराखडे तयार करुन घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी केलेली आहे. तसेच ७४ संस्थेचे अंदाज आराखडे तयार करण्यात आले असून त्यासाठी जिल्हा नियोजन समिती व राज्यस्तरावरुन निधी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

लातूर जिल्हयातील १३ रुग्णालयाचे व नाशिक जिल्हयातील २ रुग्णालयाचे फायर ऑडीट करण्यात आले आहे. जिल्हयातील इतर रुग्णालयातील फायर ऑडीट व त्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाज आराखडे प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने ठाणे महानगरपालीकेच्या अंतर्गत येणाऱ्या खाजगी

रुग्णालये व नर्सिंग होम पैकी फायर एनओसी नसलेल्या रुग्णालयांना ४८ तासांत सील करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.
(५) अग्निशमन विभागास सर्व रुग्णालयाचे फायर ऑडीट करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार सर्व रुग्णालयाचे फायर ऑडीट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरगावमंजू (जि.अकोला) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या खर्चासाठी मंजूर करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत

**(२६) * २४३३६ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) बोरगावमंजू (जि.अकोला) येथील ग्रामीण रुग्णालयास शासनाने सन २०१५ साली विशेष मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्णालयाच्या सुमारे ११.४० कोटी रुपयाच्या खर्चास निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी उच्चाधिकार समितीकडून शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयाच्या खर्चास निधी मंजूर करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहे?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.
बृहत आराखडा शासन निर्णय दि.१७ जानेवारी,२०१३ अन्वये बोरगाव मंजू (जि.अकोला) येथे ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यास मंजूरी दिलेली आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
ग्रामीण रुग्णालय,बोरगाव मंजू येथील मुख्य इमारत बांधकामाचे रु.१४४७.५८ लक्ष रक्कमेचे अंदाजपत्रक व आराखडे प्रशासकिय मान्यता व निधी

उपलब्धतेसाठी शासनास सादर करण्यात आला असता दि.२१/०३/२०१७ रोजी पार पडलेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात आला.सदर प्रस्ताव निधी अभावी उच्चाधिकार समितीने अमान्य केला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## सोलापूर शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात हिमोफिलियाकरिता इंजेक्शन उपलब्ध करून देण्याबाबत

**(२७) * २१९७३ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहर व जिल्हयामध्ये जवळपास १२० रुग्ण हे हिमोफिलिया या आजाराने त्रस्त असून सर्व रुग्णांना खाजगी रुग्णालयामधील उपचार खर्चिक असल्यामुळे पुणे अथवा सातारा येथील सिव्हील रुग्णालय येथे उपचाराकरीता जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर शहरातील श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथे हिमोफिलियाकरीता इंजेक्शन उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारितील डॉ.वै.स्मृ.शा. वैद्यकीय महाविद्यालय व श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी ई-टेंडर मागविले असून पुरवठादाराने रक्कम उद्धृत (quote) न केल्यामुळे फेर निविदा प्रक्रिया चालू आहे. तसेच, स्थानिक दरपत्रकाद्वारे सदर औषधे उपलब्ध करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मुलींच्या बालविवाहाच्या प्रमाणात होत असलेली वाढ

**(२८) * २११६० श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सन २०१९-२० मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात २१.९ टक्के मुलींचे बालविवाह होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात तसेच कोरोना संक्रमणाच्या काळात परभणी जिल्हयात बालविवाहाच्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे तसेच मुंबई, नागपूर जिल्हयातील आदिवासी पाड्यातून आदिवासी मुलींचे अपहरण करून त्यांचे बालविवाह लावून दिले जात असून राज्यात सन २०१९ मध्ये बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलींपैकी ७९६ मुलींचे विवाहांसाठी अपहरण केल्या प्रकरणी ७८४ गुन्हांची नोंद झाली असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलींचे पालकच त्यांना मुंबईतून गुजरात, राजस्थान या भागात बालविवाहासाठी पाठवत असून मुंबई मधील बोरिवली येथील नॅशनल पार्क व गोरेगाव येथील आरे आदिवासी पाड्यात टाळेबंदीच्या काळात बालविवाहाचे प्रयत्न झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परभणी जिल्हयात २५० बाल संरक्षक समित्या असूनही बाल विवाह होण्याच्या संख्येत वाढ होणे ही बाब गंभीर असून सद्य:स्थितीत राज्यात बालविवाहाच्या किती घटनांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत,

(५) असल्यास, बालविवाहाचे प्रमाण रोखण्यासाठी गावनिहाय बालसंरक्षक समित्या स्थापन करून या समित्यांना सक्षम करण्यासाठी त्याना विशेष अधिकार देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सद्य:स्थितीत राज्यात किती गावांमध्ये बालसंरक्षक समित्या स्थापन केल्या आहेत व त्यांना कोणते विशेष अधिकार देण्यात आले आहेत तसेच बालविवाहाचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने कोण-कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) होय, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सन २०१९-२० मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसर महाराष्ट्रात अल्पवयात बालविवाह होण्याचे प्रमाण सन २०१५-१६ मध्ये २६.३ टक्के होते ते आता २०१९-२० मध्ये २१.९ टक्के आहे.

(२), (३) व (४) मुंबई गोरेगाव येथील आरे आदिवासी पाडयामध्ये १ बाल विवाह नियोजित करण्यात आला होता. परंतु तो वेळीच थांबविण्यात आला. राज्यात एप्रिल २०२० ते जानेवारी २०२१ या कालावधीत ३९४ बालविवाह रोखण्यात आले आणि त्यापैकी १४ घटनांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. परभणी जिल्हयात कोव्हीड १९ च्या कालावधीत एकूण १० बालविवाह थांबविले आहेत.

(५), (६) राज्यातील ३४ जिल्हयांमध्ये एकूण ३०४१७ ग्राम बाल संरक्षण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या ग्राम बाल संरक्षण समित्यांचे प्रशिक्षण जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या माध्यमातून सुरु आहे.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) तालुक्यात जलयुक्त शिवार योजना अयशस्वी झाल्याबाबत

**(२९) * २१९९५ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाणी अडवा पाणी जिरवा यासाठी शासनाने राज्यात जलयुक्त शिवार योजना राबविली मात्र कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या गैरकारभारामुळे योजना अयशस्वी झाली असुन त्यासाठी खर्च करण्यात आलेली रक्कम वाया गेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या विविध विभागांचे ग्रामस्तरीय व तालुकास्तरीय अधिकारी ग्रामस्थांसमवेत शिवार फेरीचे आयोजन करुन जलसंधारणार्थ बापसई गावाच्या शिवारात ४ जलयुक्त शिवारास मंजुरी असताना, सदर कामे त्या गावात न करता रेवती गावात केली व ती सुध्दा केवळ दोन कामे केली असून ती निकृष्ट दर्जाची झाली आहेत तसेच रेवती गावात दोन तलाव उभारताना वनक्षेत्रातील अनेक वृक्ष वनविभागाने नष्ट करुन त्यांची परस्पर विल्हेवाट

लावली असल्याने वनविभागाच्या गैरकारभाराबाबत चौकशी करुन संबधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी बापसई ग्रामस्थ व कल्याण पंचायत समितीचे माजी सभापती यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, ठाणे, मा. वनेमंत्री, मा. पालकमंत्री, ठाणे जिल्हा आदींकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत ग्रामस्थांसमवेत शिवार फेरीचे आयोजन करून बापसई गावाचा सन २०१८-१९ मधील आराखड्यामध्ये समावेश करण्यात आला होता. त्यानुसार बापसई गावाच्या वनक्षेत्रामध्ये ४ कामे प्रस्तावित करण्यात आली होती. आराखड्यानूसार ४ वनतलावांची कामे पूर्ण करण्यात आली असून ती समाधानकारक आहेत. सदरच्या कामांची देयके अदा करण्यात आली असून बापसई येथील ४ कामामध्ये वृक्षतोड झालेली नाही.

तसेच रेवती गावात जलयुक्त शिवार योजनेची कोणतीही कामे झाली नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्यांबाबत धोरण निश्चित करण्यामध्ये होत असलेला विलंब

**(३०) * २४३९१ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत तसेच आंतरजिल्हा बदल्यांसंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल दिनांक १५ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे दहा महिन्यांचा कालावधी उलटूनही अद्याप शासनाने सदर बदल्यांसंबंधीचे धोरण निश्चित केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धोरण जाहीर करण्यात होत असलेल्या विलंबामुळे विद्यमान वर्षी ऑफलाईन पध्दतीने बदल्या व त्यातून होणाऱ्या गैरव्यवहाराला सामोरे जावे लागण्याची भीती शिक्षकांमध्ये निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू बदल्यांसंदर्भातील धोरण जाहीर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.
जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत/आंतरजिल्हा बदल्यांसंदर्भात धोरण निश्चित करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अभ्यासगटाने आपला अहवाल दिनांक १८ मार्च, २०२० रोजी शासनास सादर केला आहे.
(२), (३) व (४) अभ्यासगटाने अहवाल सादर केल्यानंतर दिनांक २२.३.२०२० पासून कोविड-१९ या रोगाच्या प्रादुर्भावामुळे संपुर्ण राज्यभर लॉकडाऊनची परिस्थिती निर्माण झाली. याप्रकरणी शिक्षकांच्या विविध संघटनांनी सुचविण्यात आलेल्या सुधारणांवर अभ्यासगटाबरोबर विचार-विनियम करण्यात आला. सद्य:स्थितीत प्रस्तुत प्रकरणी अभ्यासगटाने सुचविलेल्या सुधारणांनुसार अस्तित्वात असलेल्या शासन निर्णयामध्ये आवश्यक ते बदल करुन शासन निर्णय निर्गमीत करण्याची कार्यवाही प्राथम्याने करण्यात येत आहे .
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी रुग्णालयांकडून महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(३१) * २१९६९ श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर**

**दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची दिनांक २ जुलै, २०१२ रोजी पासून अंमलबजावणी करण्यात आली असून या योजनेंतर्गत १२१ उपचारासाठी रुग्णांना सुमारे १.५० लाख रुपये पर्यत मदत करण्यात येते तथापि यामध्ये रुग्णांचे उपचार पूर्ण होत नसल्याने या योजनेची व्याप्ती वाढवावी अशी मागणी रुग्णांच्या नातेवाईकांकडून केली जात आहे,हे खरे आहे काय,

(२) तसेच, या योजनेंतर्गत खाजगी रुग्णालये उपचार करण्यास टाळाटाळ करीत असून माहे सप्टेंबर, २०२० मध्ये खाजगी रुग्णालयांमध्ये अत्यल्प रुग्णांवरच उपचार केल्याची माहिती दिनांक २५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात माहे सप्टेंबर मध्ये २ लाखांहून अधिक रुग्ण विविध रुग्णालयांत उपचारांसाठी दाखल झाले असून त्यापैकी १ टक्का रुग्ण महात्मा ज्योतिराव फुले योजना लागू असलेल्या खाजगी रुग्णालयात दाखल झाले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील कोरोनाबाधित रुग्णांपैकी केवळ ३०% रुग्णांनाच या योजनेचा लाभ मिळाला असल्याचे निदर्शनास आले असून मुंबई शहरात सुमारे ३ लाख नागरिकांना कोरोनाची लागण झाली असून त्यापैकी केवळ १९९३ लोकांनाच या योजनेचा लाभ घेतला असून चंद्रपूर जिल्हयात देखिल या योजनेअंतर्गत समाविष्ट असणा-या दवाखान्यांची अनेक रुग्णांना उपचार करण्यास नकार देत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचू शकलेली नसल्याने काही ठराविक लोकांनाच या योजनेचा लाभ होत असल्याचे निदर्शनास आले असल्याने माहे डिसेंबर २०१९ ते नोव्हेंबर २०२० या कालावधीत आर्थिक वर्गवारी निहाय किती खर्च करण्यात आलेला आहे,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ही योजना

लागू न करण्याऱ्या रुग्णालयावर कारवाई करण्यासह सदर योजनेचे स्वरुप सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याबाबत तसेच खर्चाच्या मर्यादेची व्याप्ती वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) माहे सप्टेंबर, २०२० मध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ५५,८४७ रुग्णांवर उपचार झाले असून यापैकी खाजगी अंगीकृत रुग्णालयात ४६७१३ रुग्णांवर उपचार झाले आहेत.

(४) राज्यात एकुण २,६८,८८७ कोरोना बाधित रुग्णांवर योजनेतील अंगिकृत रुग्णालयांमध्ये माहे सप्टेंबर पर्यंत मोफत उपचार झालेले असून त्यापैकी ३९,०११ प्रकरणांची माहिती संगणक प्रणालीवर अद्ययावत करण्यात आली होती. सप्टेंबर महिन्यामध्ये १,०१,६८० कोविड बाधित रुग्णांवर योजनेतील अंगिकृत रुग्णालयांमध्ये मोफत उपचार करण्यात आले असून त्यांपैकी २१,८४० प्रकरणांची माहिती संगणक प्रणालीवर अद्यायावत करण्यात आली होती. मुंबई शहरामध्ये एकूण ५४९३८ कोरोनाबाधित रुग्णांवर योजनेतील अंगीकृत रुग्णालयामध्ये माहे सप्टेंबर पर्यंत मोफत उपचार झालेले असून त्यापैकी ७१६ प्रकरणांची माहिती संगणक प्रणालीवर अद्ययावत करण्यात आली आहे. मुंबई शहरामध्ये सप्टेंबर महिन्यामध्ये ७५३४ कोविड बाधित रुग्णांवर योजनेतील अंगीकृत रुग्णालयामध्ये मोफत उपचार करण्यात आले असून त्यापैकी ३४२ प्रकरणांची माहिती संगणक प्रणालीवर अद्ययावत करण्यात आली होती. चंद्रपूर जिल्हयात माहे सप्टेंबर २०२० मध्ये अंगिकृत रुग्णालयाबाबत उपचारास नकार दिल्याची १ तक्रार प्राप्त झाली असून त्या तक्रारीचे निराकरण झाले आहे.

(५) हे खरे नाही.

कोविड-१९ साथरोगाच्या पार्श्वभूमीवर दिनांक २३ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व नागरिकांसाठी खुली करण्यात आली आहे. माहे डिसेंबर २०१९ ते माहे नोव्हेंबर २०२० या कालावधीमध्ये शिधापत्रिका वर्गवारी निहाय झालेल्या उपचारांच्या खर्चाची आकडेवारी खालीलप्रमाणे,

• पिवळी, अंत्योदय व अन्नपूर्णा शिधापत्रिका: रुपये ३४४,६१,८६,८३३/-
• केशरी शिधापत्रिका: रुपये ९४१,२३,९९,०४६/-
• शुभ्र शिधापत्रिका १४ अवर्षणग्रस्त शेतकरी कुटुंबे: रुपये ११,४२,५१७८/-
• शुभ्र शिधापत्रिका (२३ मे २०२० पासून) रूपये ४१,९३,२०,५१४/-

(६) १ एप्रिल २०२० पासून आजपर्यंत अंगिकृत रुग्णालयांबाबत ३४५१ तक्रारी प्राप्त झाल्या असून २२२३ तक्रारीचे निराकरण झाल्या असून १२२८ तक्रारी निराकरणाच्या प्रक्रियेमध्ये आहेत.

-----------------

## पुणे जिल्हा परिषदेमध्ये बनावट दिव्यांग दाखल्यांच्या आधारे अधिकारी/कर्मचारी यांच्या झालेल्या नियुक्त्या व पदोन्नतीबाबत

**(३२) * २०९०५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेमध्ये सन २०१५ ते २०२१ दरम्यान बनावट दिव्यांग दाखल्याच्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे विभागांतील अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्त्या, पदोन्नती व बदल्या झाल्या असून सदर अधिकारी व कर्मचारी गेल्या पाच वर्षांपासून विविध पदांवर कार्यरत असून वेतनासह सर्व लाभ घेत असल्याने याबाबत चौकशी करण्याची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांना दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने संबंधित विभाग प्रमुख व शाखा प्रमुखांवर जबाबदारी निश्चित करून नियमाधीन कारवाई करण्याबाबत दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजी लेखी पत्रव्यवहार केला असता विलंब करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई झाली नसून उपलब्ध करून दिलेल्या माहितीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणी तक्रार अर्ज सादर केलेला आहे. तथापि बनावट दिव्यांग दाखल्याच्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियुक्त्या, पदोन्नती व बदल्या झाल्याचे व सदरचे अधिकारी व कर्मचारी गेल्या पाच वर्षापासून विविध पदांवर कार्यरत असून वेतनासह लाभ घेत असल्याचे अद्याप निदर्शनास आले नाही.

दिव्यांग प्रमाणपत्राची पडताळणीबाबत जिल्हा परिषद स्तरावर दि. ९.१२.२०२० रोजी समिती स्थापन केली असून सदर समितीने विविध विभागामध्ये असलेली सर्व संवर्गाची मागील ३ वर्षाची दिव्यांग प्रमाणपत्रानुसार करण्यात आलेली सरळसेवा भरती, पदोन्नती व बदल्या अशा १८० कर्मचाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची तपसणी करुन त्यापैकी दिव्यांगात्वाचा विचार करुन ५६ दिव्यांग कर्मचाऱ्यांची फेर तपासणी करण्याबाबत अधिष्ठाता व वैद्यकीय अधिक्षक, ससून सवौपचार रुग्णालय, पुणे यांना कळविले असून याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही,

जिल्हा परिषदे अंतर्गत असलेले एकूण संवर्ग संख्या व सर्व संवर्गाची मागील तीन वर्षामधील नियुक्त्ती, पदोन्नती व बदली बाबतची माहिती विविध विभागांकडून मागवून सदर माहितीचे संकलन करण्यासाठी कालावधी लागला आहे. सदर माहिती सन्मानीय सदस्यांना सादर केली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.सांगरुण (ता.हवेली,जि.पुणे) येथील नदीपात्रावर पादचारी पूलाचे बांधकाम करणेबाबत

**(३३) * २२४९४ श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.सांगरुण (ता.हवेली,जि.पुणे) येथून ५ ते १० मिनिटांचे अंतरावर मौजे सोनापूर मार्गे पानशेत धरण (पर्यटन स्थळ) क्षेत्राकडे जाण्या-येण्यासाठी तेथील ग्रामस्थ व नागरिकांच्या सोईसाठी पुणे जिल्हा परिषदेमार्फत नावेची (होडी) सुविधा करण्यांत आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामस्थांच्या अंतर्गत वादविवादामुळे सदर नावेची (होडी) सुविधा गेल्या ४ वर्षांपासून जिल्हा परिषदेने बंद केल्याने मुळा-मुठा नदीच्या अलिकडील व पलिकडील ग्रामस्थ व अन्य नागरिकांना पानशेतकडे जाण्या-येण्यासाठी खडकवासला मार्गे एसटी बसने प्रवास करावा लागत असल्याने त्याबाबत सुविधा करण्यात यावी असे निवेदन दिनांक १४ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौ.सांगरुण ते मौजे सोनापूर येथे दोन्ही बाजूंनी तारेच्या कुंपणाने झाकलेला कायमस्वरुपी पादचारी पूल बांधण्यात यावा अशी मागणी तेथील ग्रामस्थ व नागरिकांनी मा.ग्रामविकास मंत्री,प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पुणे,कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, जि.प.पुणे गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हवेली जि.पुणे यांच्याकडे दिनांक ३ व ७ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) मौजे सांगरुण व मौजे सोनापूर ही गावे खडकवासला धरणाच्या बुडीत क्षेत्रालगत वसलेली आहेत. दोन्ही गावांच्या मध्ये जलाशय असून जलाशयामधून सरळ अंतर १.०० कि.मी.आहे. सदर गावांना जोडण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायत सोनापूर व सांगरुण यांना होडया पुरविण्यात आलेल्या आहेत. तथापि, कुशल ऑपरेटर नसल्याने सदर होडया सद्य:स्थितीत बंद आहेत.

सोनापूर व सांगरुण गावांना जलाशयातून सरळ जोडण्यासाठी पूल बांधावयाचा झाल्यास अंदाजे रु.६०.०० कोटी व दोन पदरी पूल बांधकामासाठी अंदाजे रु.१५०.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. जिल्हा परिषदेकडे एवढया मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होऊ शकत नाही. तसेच एवढा मोठा पूल देखील जिल्हा परिषदेमार्फत बांधणे शक्य नाही.

सदर स्थळापासून मौजे सांगरुण व सोनापूर गावांना जोडण्यासाठी अपस्ट्रीम बाजूस ६.०० कि.मी.अंतरावर व डाऊनस्ट्रीम बाजूस १०.०० कि.मी.अंतरावर वाहतूकीसाठी चांगले डांबरी पर्यायी रस्ते उपलब्ध आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील सुपरस्पेशालिटी रुग्णालयातील प्रस्तावित हृदय प्रत्यारोपण केंद्रात आवश्यक वैद्यकीय यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्याबाबत

**(३४) * २१४४५ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील सुपरस्पेशालिटी रुग्णालयात हृदय प्रत्यारोपण केंद्रास शासनाकडून मंजुरी मिळाली असुनही हाफकीन संस्थेकडून हृदय प्रत्यारोपण केंद्र सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले दोन डायलिसीस यंत्रे, 'इग्मो' यंत्र, नायट्रिक ऑकसाइड व्हेंटिलेटर, जंतुसंसर्ग टाळण्यासाठी पॉझिटिव्ह प्रेशर असलेला वॉर्ड आणि कार्डियाक बायोप्सी इत्यादी वैद्यकीय यंत्रांची अद्यापही खरेदी करण्यात आली नसल्याची बाब दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील प्रस्तावित हृदय प्रत्यारोपण' केंद्रामुळे महाराष्ट्रासह मध्य भारतातील गरजू रुग्णांनाही उपचार मिळणे शक्य होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,,

(४)असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या केंद्रासाठी आवश्यक असलेली वैद्यकीय यंत्र सामुग्री तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) अंशतः खरे आहे.

अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर संस्थेस हृदयप्रत्यारोपण केद्रास

मान्यता प्राप्त असून, सदर बाबीसाठी आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे कडून इग्मो रोटाप्लो (इग्मो मशीन ) प्राप्त झाले आहे. सदर हृदय प्रत्यारोपन केंद्रासाठी आवश्यक असलेली अन्य यंत्रसामुग्री अद्याप खरेदी करण्यात आलेली नाही. सदर यंत्रसामुग्री खरेदीसाठी निधीचे नियोजन करण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) संबंधित संस्थेने हृदय प्रत्यारोपण केंद्रासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री खरेदीसाठी २०२०-२१ तसेच आगामी आर्थिक वर्षात विविध योजनांतर्गत निधी उपलब्ध करून देण्याची विनंती जिल्हाधिकारी कार्यालयास केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गौळाणे (ता.जि.नाशिक) येथील लघु पाटबंधारे योजनेसाठी करण्यात आलेले भूसंपादन रद्द करण्याबाबत

**(३५) * २३०४४ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील गौळाणे लघुपाटबंधारे तलावाच्या मुख्य कालवा क्रमांक १, २ व ३ साठी मौ. विल्होळी व गौळाणे येथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौ. विल्होळी येथील ४८ उपगटातून सदरचे कालवे गेलेले असतांनाही सदर कालव्यांचा शेती सिंचनासाठी काहीही उपयोग होत नसून तलावात पाणी साठाही कमी होत असल्यामुळे भविष्यात देखील त्याचा सिंचनासाठी उपयोग होऊ शकत नाही अशा तक्रारी संबंधित शेतकऱ्यांनी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावातून शेतकऱ्यांनी विद्युत पंपाच्या सहाय्याने पाणी उचलण्याच्या परवानग्या घेऊन पाणी उपसा करीत असल्याने पाटचाऱ्यांना पाणीच सोडले जात नसल्याच्या तक्रारी करुन गौळाणे योजनेसाठी केलेले

भूसंपादन रद्द करण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली असुन स्थानिक लोकप्रतिनिधींनी भूसंपादन प्रक्रिया रद्द करण्याची मागणी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांच्या तक्रारी व लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने सदर लघुपाटबंधारे योजनेसंदर्भात कालवा क्र. १, २ व ३ चे भूसंपादन रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

गौळाणे ल.पा. तलाव, नाशिक कालवा क्र.१, २ व ३ साठी मौ.विल्होळी व गौळाणे येथील जमिनीच्या भुसंपादनाकरीता प्रस्ताव भुसंपादन प्रकरण क्र.७/९१ अन्वये लघु पाटबंधारे विभाग, नाशिक यांचे मार्फत सादर करण्यात आलेला आहे. सदर भुसंपादन केसची कलम ४ ची अधिसुचना दिनांक ५.१२.२००२ रोजी उपजिल्हाधिकारी, भुसंपादन लघु पाटबंधारे, नाशिक यांचे मार्फत प्रकाशित करण्यात आलेली आहे. कलम ४ अधिसुचनेनंतर सदर प्रकरणात पुढील कार्यवाही झालेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) लघु पाटबंधारे योजना गौळाणे कालवा क्र.१, २ व ३ रद्द करणे संबधी सर्व प्रक्रिया अंतिम टप्यात आलेली असून कालव्यासाठी संपादित कराव्या लागणा-या जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव ७/९१ रद्द करणे संबधी तसेच सदर प्रस्तावातील भूधारकांच्या ७/१२ उता-यावर भूसंपादन कायदा कलम ४(१) च्या नोटीशीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या कच्ची नोंद रद्द करणेसंबधित भूसंपादन अधिकारी यांचे मार्फत प्रगतीपथावर आहे. त्या अनुषंगाने पाठपुरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात राबविण्यात आलेल्या क्षयरोग रुग्ण शोध मोहिमेबाबत

**(३६) * २०७८८ श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील**

**(अमळनेर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत माहे मार्च, २०२० पासून वाढ होत असताना त्या दरम्यान क्षय रुग्णांच्या शोध मोहिमेत खंड पडल्यामुळे क्षयरोग रुग्णांच्या संख्येत ३० टक्क्यांनी वाढ झाली असून मुंबईत ४८५ नविन क्षयरोग रुग्णांचे निदान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहं काय,

(२) असल्यास, राज्यात क्षयरोग निवारण यंत्रणा काम करीत असली तरीही सुप्त क्षयरोगामुळे कोविड-१९ हा आजार वाढण्याची शक्यता असल्याने सर्व क्षयरोग रुग्णांची कोविड-१९ तपासणी करण्यात यावी असे निर्देश आरोग्य मंत्रालयांने राज्याला दिले असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२१ रोजी वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही व्यक्तींचा क्षयरोग हा आजार लपविण्याकडे कल असल्यामुळे अशा व्यक्तींच्या उपचारांमध्ये खंड पडू न देता त्यांचे उपचार पूर्ण करण्यात यावेत असेही निर्देश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, क्षयरोग रुग्णांची शोध मोहिम पुन्हा सुरु करुन क्षयरोग रुग्णांची वाढत असलेली संख्या कमी करणेबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे डिसेंबर २०२० मध्ये घेण्यात आलेल्या सक्रीय क्षयरुग्ण शोधमोहिमेत मुंबईमध्ये ५०२ रुग्ण व इतर ४२१९ असे एकूण ४७२१ क्षयरुग्ण शोधण्यात आले. सदर रुग्णांचे प्रमाण नोव्हेंबर २०२० च्या तुलनेत २०.४४ टक्क्यांनी अधिक आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

केंद्रीय क्षयरोग विभाग नवी दिल्ली यांच्या दि.१.९.२०२० च्या पत्रानुसार क्षयरोग व कोविड १९ आजारासाठी द्विदिशात्मक (Bidirection Screening) तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार राज्यात २२.०९.२०२० पासून द्विदिशात्मक तपासणी करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

कोविड व क्षयरोगाची लक्षणे सारखी असल्याकारणाने काही क्षयरोग संशयित /रुग्ण हे भीतीने आपली लक्षणे नाकारत असून चाचणी करण्यास तयार होत नाहीत. केंद्रिय क्षयरोग विभागामार्फत कोरोना महारामारीच्या सुरुवातीच्या काळातच प्रत्येक क्षयरुग्णाला १ महिन्याचे औषध देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत काम करणा-या कर्मचा-यांनी कोरोना बाधित प्रतिबंधित क्षेत्रात राहणा-या रुग्णांना घरपोच औषधे पुरविण्यात आली. जेणेकरुन रुग्णांच्या उपचारात खंड पडला नाही.

(४) क्षयरोग रुग्ण शोधण्याकरिता माहे डिसेंबर २०२० मध्ये सक्रीय क्षयरोग रुग्ण शोधमोहिम दि. १ डिसेंबर, २०२० ते दि.३१ जानेवारी, २०२१ पर्यंत राबविण्यात आली व त्यामध्ये १२८२३ नवीन क्षयरुग्ण शोधून त्यांना उपचारावर आणण्यात आले.

सद्य:स्थितीत दि. ८ फेब्रुवारी, २०२१ पासून ते दि. ३० एप्रिल, २०२१ पर्यंत क्षयरोग रुग्ण शोधमोहिम पुन्हा राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इसोली (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील ग्रामपंचायतीमध्ये १४ व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त झालेल्या निधीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३७) * २१६९८ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इसोली (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील ग्रामपंचायतमध्ये १४ व्या वित्त आयोगातंर्गत दलित वस्ती अंगणवाडी शाळा, घरकुल व शौचालय योजनेसाठी प्राप्त झालेल्या निधीमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासह इतरांनी दिनांक १८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, गैरव्यवहाराची चौकशी करून दोषीवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी श्रीमती श्वेता महाले, मा.वि.स.स. चिखली यांनी दि.२३.७.२०२० रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांच्याकडे केली आहे.
(३) व (४) गैरव्यवहारासंबंधात प्राथमिक चौकशी करण्यात आली असून संबंधितांकडून खुलासे प्राप्त करून घेऊन अपचाऱ्यांवर दोषारोप निश्चित करण्याबाबत नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

## निसर्ग चक्रीवादळामुळे म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील व सातारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांचे झालेले नुकसान

**(३८) * २०४९६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निसर्ग चक्रीवादळामुळे म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील नुकसान झालेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांची अद्यापपर्यंत दुरुस्ती करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच निसर्ग चक्रीवादळामुळे सातारा जिल्हयातील नुकसान झालेल्या एकूण ८० शाळांमध्ये, सातारा तालुक्यातील मौ.कण्हेर, जुने गावठाण, आष्टे पुन.नागठाणे, फलटण तालुक्यातील मौ.कापशी व महाबळेश्वर, खटाव, जावळी, कराड व पाटण तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचे २ कोटी ३१ लाख ३६ हजार इतक्या रक्कमेचे नुकसान झाले असल्याचे दिनांक ९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हसळा तालुक्यातील नुकसान झालेल्या प्रत्येक शाळेला २ लाख रूपये निधी देण्याबाबतची घोषणा करुनही अद्यापपर्यंत निधी प्राप्त झाला नाही तसेच सातारा जिल्हयातील शाळांना दुरुस्तीसाठी निधी मिळावा यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत प्रस्ताव पाठवूनही निधी प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित शाळांना निधी उपलब्ध करुन देण्यासह शाळा तात्काळ दुरुस्त करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

तथापि, निसर्ग चक्रीवादळात नुकसान झालेल्या प्राथमिक शाळागृह दुरुस्तीसाठी सन २०२०-२१ या वर्षाकरिता रुपये १२,४९,४०,०००/- इतका निधी जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून जिल्हा परिषद, रायगड यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

सातारा जिल्हयातील नुकसान झालेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची दुरुस्ती करण्याकरिता शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे निधीची मागणी केली असून अद्याप निधी प्राप्त झालेला नाही.

(४) रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे आणि सातारा जिल्हा परिषद शाळा दुरुस्तीसाठी अद्याप निधी प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्याला तेथील जलाशयाचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) * २४२९१ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, कल्याण या शहरांना शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील जलाशयातून पाणीपुरवठा केला जातो तथापि शहापूर तालुक्याला सदर जलाशयाचे पाणी मिळत नसल्याने या तालुक्यात दरवर्षी पाणीटंचाई असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यात दरवर्षी पाणीटंचाई निर्माण होत असल्याने तेथील गांवाना टँकरद्वारे पाणी पुरविण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर जलाशयाचे पाणी शहापूर तालुक्याला उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

शहापूर व कल्याण या तालुक्यातील भातसा नदी काठावरील ३८ ग्रामपंचायतीना पिण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत धरणातून पाणी उपलब्ध करून देण्यात येते. तसेच टंचाई काळामध्ये गांवाचे आकस्मिक पाणी मागणीसाठी शा. नि. संकीर्ण २०१८/(५११/१८)/सिं. व्य. (धो.), दि. ०१/१२/२०१८ अन्वये जिल्हयांचे पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली समितीमध्ये निर्णय घेण्यात येतो.

(२) होय, हे खरे आहे.

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,जिल्हापरिषद ठाणे यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार शहापूर तालुक्यात दि. ३१/०१/२०२० ते दि. १६/०६/२०२० या कालावधीत ५४ गावे व १६५ पाडे असून एकूण २१९ गांवपाडयांना ३५ टँकरने पाणी पुरवठा केला गेला आहे.

(३) भातसा धरणाच्या सुधारित जलनियोजनानुसार धरणाच्या उपयुक्त पाणीसाठ्यामधून पाणी आरक्षण पूर्ण झाले आहे. परंतु राज्य जल निती प्रमाणे

क्षेत्रिय वाटपात पिण्यासाठी पाणी वापरास प्रथम प्राधान्य असल्याने शहापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त भागाच्या पिण्याच्या पाण्याची मागणी प्राप्त झाल्यास प्रचलित शासन नियमांच्या अधिन राहून पाणी उपलब्ध करून देण्याचे धोरण आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहेरी (जि.गडचिरोली) मतदार क्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये तेंदूपत्ता संकलन व विकास कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४०) * २३८४६ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहेरी (जि.गडचिरोली) मतदार श्रेत्रातील इंदाराम, आलापल्ली, नागेपल्ली, देवलमरी, व्यंकटरावपेठा, खमनचेरु, रेपनपल्ली, बामणी, गरकापेठा या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायतचे सरपंच/पदाधिकारी व कर्मचारी यांनी संगनमत करुन सन २०१५ ते २०२० या कालावधीत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ग्रामपंचायतीत तेंदूपत्ता निविदाप्रक्रिया पार पाडतांना शासनाने ठरविलेल्या दिशानिर्देशाचे पालन न करता ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमत करुन ठराविक कंत्राटदाराला तेंदूपत्ता संकलनाचे काम कमी दराने दिल्याने शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान झाले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उपरोक्त ग्रामपंचायतीमध्ये रस्ते व नालीबांधकामात करण्यात आलेल्या विकास कामांमध्ये ग्रामपंचायतचे सरपंच व सचिव यांनी ठराविक कंत्राटदारास कामाचे वाटप केले असून सदर कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या गैरव्यवहारातील संबंधितांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही, हे खरे नाही
(२) नाही, हे खरे नाही.
(३) नाही, हे खरे नाही. उपरोक्त ग्रामपंचायतीमध्ये रस्ते व नालीबांधकामे ही स्वतः ग्रामपंचायतीने केलेले असुन तांत्रिक अधिका-यानी त्यांचे मुल्यांकन करुनच सदर कामाचे देयके अदा केलेली आहेत.
(४) वरील प्रकरणात कोणत्याही प्रकारची तक्रार ग्रामपंचायतीला, पंचायत समितीला किंवा जिल्हा परिषद कार्यालयाला प्राप्त झालेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात वैद्यकीय आस्थापना कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(४१) * २०३९० अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), अॅड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय सेवांच्या प्रमाणिकरणासाठी या क्षेत्रातील अपप्रवृत्तींना आळा घालण्यासाठी परिणामकारक ठरणाऱ्या वैद्यकीय आस्थापना कायद्याची अंमलबजावणी इतर राज्यात झालेली असून अद्याप महाराष्ट्र राज्यात झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना संक्रमणाच्या काळात रुग्णांची मोठया प्रमाणात फसवणूक झालेली असून सदर कायद्याची अंमलबजावणी करण्याची नितांत गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कायदा लागू झाल्यास दवाखाने, रुग्णालये, नर्सिंग होम, रक्तपेढ्या, रक्त चाचणी करणाऱ्या प्रयोगशाळा, डायग्नोस्टिक लॅब, डे केअर सेंटर यांची नोंदणी स्थानिक आरोग्य व्यवस्थेकडे करणे सुलभ होईल, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, राज्यात सदर कायद्याची तात्काळ अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) खाजगी वैद्यकीय व्यवसायकांमार्फत कोरोना रुग्णांची आर्थिक फसवणूक होऊ नये यासाठी दि. ३०.०४.२०२०, दि.२१.०५.२०२०, व दि.३१.०८.२०२०, रोजी अधिसूचना जारी करुन वैद्यकिय सेवेचे दर नियंत्रण करण्यात आले आहे. तसेच आरोग्य यंत्रणेमार्फत चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयातील सर्व रुग्णांना सर्व उपचार मोफत देण्यात येत आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) रुग्णहिताच्या दृष्टीने महाराष्ट्रात शुश्रुषागृह नोंदणी नियम, १९७३ मध्ये आवश्यक सुधारणा करुन दि.१४.०१.२०२१ रोजी सुधारित नियम २०२० अधिसूचीत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी वैद्यक व्यवसाय करणाऱ्या डॉक्टर्स व त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत नर्सेसना विमा संरक्षण कवच मिळण्याबाबत

**(४२) * २१२३३ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय सेवेत कार्यरत असलेले डॉक्टर्स, नर्सेस यांचा कोरोनामुळे मृत्यू झाल्यास त्यांना ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण कवच जाहीर केलेले आहे

परंतु खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टर्संना व त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत नोंदणीकृत नर्सेसना असे विमा संरक्षण कवच जाहीर करण्यात आलेले नसल्यामुळे खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टर्स व त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत नर्सेसना विमा संरक्षण कवच मिळण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक ४ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमा संरक्षण देण्याची योजना केंद्र शासनाची असूनही मुंबई, पुणे, ठाणे, डोंबिवली, कल्याण येथील सुमारे ५१५ डॉक्टरांच्या कुटुंबियांचे अर्ज राज्य शासनाने नामंजूर केले असून मृत डॉक्टरांच्या कुटुंबियांना विमा रक्कम देण्याची मागणी इंडियन मेडिकल असोसिएशने मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे अनेक वेळा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टर्संना व नर्सेसना विमा संरक्षण कवच देण्यासह मृतांच्या कुटुंबियांना विमा रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत कोविड रुग्णालयामध्ये तसेच कोविड रुग्णांना प्रत्यक्ष सेवा देणा-या शासकीय सेवेत कार्यरत डॉक्टर्स, नर्सेस इ. कर्मचारी व कोविड बाधित कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत क्षेत्रिय आरोग्य कर्मचारी यांचा कोरोनामुळे मृत्यू झाल्यास त्यांना रु.५० लाख चा विमा संरक्षण कवच देण्यात आले आहे. सोबतच या योजनेअंतर्गत राज्यातील ज्या खाजगी व्यवसायिक व त्यांच्या आस्थापनेवरील कार्यरत नर्सेस यांचे रुग्णालयाची सेवा शासनाकडून कोविड सेवेकरिता अधिग्रहित केले असल्यास तसेच खाजगी रुग्णालये कोविड उपचारासाठी नामनिर्देशित केले असल्यास या ठिकाणी कार्यरत असलेले डॉक्टर्स, नर्सेस व इतर वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या सर्व संवर्गांना प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत विमा संरक्षण लागू आहे.

प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेजच्या निकषानुसार राज्य कार्यालयास प्राप्त व प्रलंबित वैद्यकीय अधिकारी यांच्या अर्जांची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे :-

| | एकूण प्राप्त | मान्य | प्रलंबित | अमान्य |
|---|---|---|---|---|
| खाजगी | ३० | ३ | ५ | २२ |
| शासकीय | १३ | ६ | ७ | - |
| | ४३ | ९ | १२ | २२ |

तसेच उपरोल्लेखित २२ खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांचे विमा प्रस्तावानुसार त्यांच्या सेवा प्रत्यक्ष कोविड रुग्णसेवेशी संबंधित नसून, त्यांचे सेवा खाजगी स्वरुपाच्या होत्या व शासनामार्फत कोविड रुग्णसेवेकरिता अधिग्रहित केलेल्या नव्हत्या. तसेच त्यांचे खाजगी रुग्णालय कोविड रुग्णसेवेसाठी नामनिर्देशित नसल्यामुळे त्यांचे दावे प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत लागू असलेल्या अटी व शर्तीनुसार अमान्य करण्यात आले आहेत.

(३) प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांना ५० लाखाचे विमा संरक्षण उपलब्ध करून देण्याबाबत विभागाकडून केंद्र शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात आला असून केंद्र शासनाने सदर प्रस्ताव अमान्य केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बेलाटी ते पाथरी (जि.सोलापूर) या रस्त्याचे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून केलेले काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४३) * २४३८२ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलाटी ते पाथरी (जि.सोलापूर) रस्ता सन २०१९ मध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून २ कोटी खर्चून तयार करण्यात आला असून सदरहू रस्त्याचे काम निकृष्ट झाले असल्याने कामाची चौकशी करुन रस्ता दुरुस्त करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, दक्षिण सोलापूर यांनी मा.ग्रामविकास मंत्री व कार्यकारी

अभियंता, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, सोलापूर यांना माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, त्यानुसार सदरहू रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह रस्ता तात्काळ दुरुस्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) बेलाटी ते पाथरी ग्रामा-५४ साखळी क्र.०/०० ते ५/९२५ या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे हे काम दिनांक ०३ ऑगस्ट, २०१८ रोजी पुर्ण झाले आहे. सदरचे काम प्रगतीत असताना, तीन राज्य गुणवत्ता निरिक्षक व एक वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांचेकडून तपासणी करण्यात आली होती. रस्त्याच्या गुणवत्तेबाबतचे शेरे समाधानकारक आहेत.
सद्य:स्थितीत कार्यकारी अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो., महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, सोलापूर यांनी सदरच्या रस्त्याची पाहणी केली असता, N.H.A.I. च्या प्रगतीत असलेल्या कामातील साहित्याच्या जड वाहतुकीमुळे काही ठिकाणी रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. संबंधित ठेकेदारास सदर रस्त्याच्या दुरूस्तीबाबत आदेश दिलेले असुन ठेकेदारामार्फत रस्त्याच्या देखभाल दुरूस्तीचे काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात रोगनिदान प्रयोगशाळा (पॅथॉलॉजी लॅब) सुरु करण्याबाबतची नियमावली तयार करण्याबाबत

**(४४) * २०४४१ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रोगनिदान प्रयोगशाळा (पॅथॉलॉजी लॅब) सुरु करण्यासाठी स्पष्ट नियमावली नसल्यामुळे मागील काही महिन्यांपासून राज्यभर अनेक अनधिकृत रोगनिदान प्रयोगशाळा सुरू करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक ठिकाणी जमा केलेल्या आणि तपासणी केलेल्या अहवालांवर प्रत्यक्ष पाहणी न करता अनेक एम.डी. पॅथॉलॉजीस्ट स्वाक्षरी करीत असल्याचे देखिल निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नियमावलीत औषधांच्या दुकानांमधील फार्मासिस्ट प्रमाणे पॅथॉलॉजीस्टनाही एकाहून अधिक ठिकाणी काम करण्यास बंदी घालण्यासंबंधी नियम करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन अनधिकृत रोग निदान प्रयोगशाळा व बेकायदेशीर स्वाक्षरी व अहवाल दिलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्यासह प्रयोगशाळांसाठी नियमावली तयार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) नाही.

(२) व (३) होय, याबाबत महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने दि.०१.०९.२०१८ च्या अधिसूचनेव्दारे सर्व पॅथॉलॉजीस्टना, त्यांच्या सहभागाने केलेल्या प्रयोगशाळा चाचण्यांचे अहवाल (Clinical Lab/Radiological Report) स्वाक्षरीत करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहे.

(४) याबाबत परिषदेकडे १० तक्रारी प्राप्त झाल्या असून यापैकी ८ डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली आहे. उर्वारित २ डॉक्टरांची चौकशी करण्यात येत आहे.

तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना अधिनियम २०१० ऐवजी शुश्रृषा गृह नोंदणी नियम १९७३ मध्ये सुधारणा करण्यात केली आहे आणि त्यामध्ये रोग निदान प्रयोगशाळा (पॅथॉलाजी लॅब) समाविष्ट नाही.

(५) विलंब झाला नाही.

-----------------

## चिर्ले (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या दस्ताऐवजांमध्ये फेरफार करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(४५) * २३६२१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिर्ले (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायतीचे सरपंच, माजी उपसरपंच आणि ग्रामसेवक यांनी संगनमताने ग्रामपंचायतीच्या महत्त्वाच्या दस्ताऐवजांमध्ये फेरफार करून गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोकण विभागीय आयुक्तांनी रायगड जिल्हा परिषदेला चौकशीचे आदेश दिले आहेत,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेशानुसार या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही, हे खरे नाही. तथापि, दि. १५/०२/२०१८ रोजी झालेल्या मासिक सभेचे इतिवृत्त नजरचुकीने पूर्ण करायचे राहून गेले होते ते नंतर पूर्ण केलेले आहे असे चौकशी दरम्यान निदर्शनास आलेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे मार्फत चौकशी करणेत आलेली आहे. अपूर्ण असलेले इतिवृत्त नंतर पूर्ण करणेत आले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) कारणे दाखवा नोटीस देवून संबंधित ग्रामविकास अधिकारी यांचा खुलासा मागविणेत आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैद्यकीय सेवेमध्ये सातत्यपूर्ण काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी यांची स्थायी पदावर कायमस्वरूपी नियुक्ती करण्याबाबत

**(४६) * २०३९२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चंद्रकांत जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय सेवेमध्ये सातत्यपूर्ण काम करणाऱ्या राज्यातील सरकारी रुग्णालयात ४८० वैद्यकीय अधिकारी हे स्थायी पदांवर तात्पुरत्या स्वरुपात (कंत्राटी पध्दती) नियुक्तीवर असून वर्षोनुवर्षे या रुग्णालयांतील अपघात विभाग, प्रशासन कोर्टकॉल तसेच कोविड काळात रात्रंदिवस काम करूनही शासनाने कायमस्वरूपी सेवेत सामावून न घेता त्यांना मानधन तत्वावर नियुक्ती देण्यात येत असून या डॉक्टरांची सेवा अद्यापपर्यंत कायमस्वरुपी करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरकारी वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नीत रुग्णालयांच्या अस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी पदावर नियुक्त्या करण्याचा अधिकार महाविद्यालयांच्या अधिष्ठाता यांना असुन त्यानुसार या पदांवर नियुक्त्या केल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थायी पदांवर नियुक्त्या करण्यात आल्यानंतर वर्षोनुवर्षे या पदाचे काम आणि अनुभव आल्यानंतरही या पदांवर कायमस्वरुपी नियुक्ती होत नसल्याने या वैद्यकीय अधिका-यांनी वारंवार मा.मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना निवेदने देऊनही त्यांना फक्त आश्वासने मिळत असून, अनुभव असूनही कायमस्वरुपी डॉक्टरांपेक्षा मिळणारा कमी पगार, तसेच अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे या वैद्यकीय अधीका-यांना कोणतेही भत्ते व अन्य सवलती दिल्या जात नसल्याने दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी पासून पुढील आठ दिवस काळया फिती लावून हे डॉक्टर काम करणार असून दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी पासून काम बंद आंदोलन करण्याचा इशारा या डॉक्टरांनी दिला होता, हे ही खरे आहे काय ,

(४) तसेच, राज्यातील १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये काम करणा-या वैद्यकीय अधिका-यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याच्या मागणीसाठी लातूर येथील वैद्यकीय महाविद्यालय अधिकारी संघटनेच्या वतीने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेत दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास काम बंद आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील सरकारी रुग्णालयात ४८० वैद्यकीय अधीकारी हे स्थायी पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती केल्यानंतर अनेक वर्षांचा अनुभव असतानाही त्यांना आजमितीस कायमस्वरुपी नियुक्त्या न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच स्थायी पदांवर कायमस्वरुपी नियुक्त्या करण्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) अंशतः खरे आहे.

(२) वैद्यकीय अधिकारी पदावर तात्पुरत्या नियुक्त्या करण्याचा अधिकार त्या-त्या वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखालील विभागीय निवड मंडळास आहेत.

(३) अंशतः खरे आहे.

(४) खरे आहे.

(५) तात्पुरत्या सेवा नियमित करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय तसेच

मा.उच्च न्यायालयांनी विविध प्रकरणांत पारित केलेल्या न्यायनिर्णयानुसार प्रस्थापित झालेल्या वैधानिक निर्बंधामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्यासंदर्भात अडचणी आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.